सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# कार्यक्रम अंदाजपत्रक

## २०२६-२०२७

## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय, नागपूर

२०२६

# कार्यक्रम अंदाजपत्रक

२०२६-२०२७

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

# पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना … … … … | १ |
| २. | पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाची समग्र माहिती … … … | २ |
| ३. | विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांची माहिती | |
| | ३.१ महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची माहिती … … | ६ |
| | ३.२ भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेची माहिती … … … | १० |
| ४. | पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या योजनांची माहिती | |
| | ४.१ जल जीवन मिशन … … … … | १३ |
| | ४.२ ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम … … … … | १९ |
| | ४.३ स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) … … … … | २७ |

# प्रकरण क्रमांक - १

## प्रस्तावना

१. राज्यात सर्व शहरांना व गावांना स्वच्छ पिण्याचे पाणी पुरवठ्याचा कार्यक्रम परिणामकारकरित्या राबविण्यासाठी शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. शाकानि १०९५/सीआर-२८९/१८ (रवका), दिनांक ९ नोव्हेंबर, १९९५ अन्वये "पाणी पुरवठा व स्वच्छता" या स्वतंत्र विभागाची निर्मिती करण्यात आलेली आहे.

२. तद्नंतर मंत्रीमंडळाच्या मान्यतेने, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या दि. २३.०१.२०१४ च्या शासन निर्णयान्वये नागरी भागातील पाणी पुरवठा व स्वच्छता विषयक कामे नगर विकास विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आली. त्यामुळे आता पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व ग्रामीण भागातील स्वच्छता विषयक कामकाज हाताळले जाते.

३. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून कार्यान्वित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमाचे स्वरुप लक्षात घेऊन उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे सर्व कार्यक्रमांची अद्ययावत माहिती प्रकाशनात देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

# प्रकरण क्रमांक - २

## पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाची समग्र माहिती

**१. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रमुख कामकाज :—**

१) ग्रामीण भागातील नागरीकांना पिण्याचे शुध्द पाणी उपलब्ध करुन देणे.

२) ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करणे.

३) ग्रामीण भागातील नागरिकांच्या वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छते संबंधित सर्व कार्ये हाताळणे.

४) ग्रामीण भागातील पाणी गुणवत्ता व संनियंत्रणाचे कामकाज.


५) टंचाईच्या काळात टँकरने पाणी पुरवठा करणे.

६) भुजलाचा विकास व व्यवस्थापन करण्याच्या अनुषंगाने आवश्यक त्या उपाययोजना करणे.

**तक्ता क्रमांक – ०१**

**संरचना**

**अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव**




विभागामध्ये सहसचिव/उपसचिव/मु.अ. तथा वि.का.अ. यांच्या सह राज्य पाणी व स्वच्छता मिशनचे कामकाज मिशन संचालक यांच्याकडून हाताळण्यात येते. यांच्या अधिपत्याखाली अवर सचिव—कक्ष अधिकारी (पापु–०६/११/२५) हे कार्यासन आहेत.

**तक्ता क्रमांक-२**

## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय (खुद्द) साठी आकृतीबंधानुसार एकूण १५४ नियमित पदे व २२ मनुष्यबळ सेवा बाह्ययंत्रणेव्दारे मंजुर असून त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

**अ) नियमित पदे-**

| अनुक्रमांक | पदनाम | वेतन श्रेणी/ वेतनसंरचना | मंजूर पदे |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | प्रधान सचिव | संवर्ग पद | १ |
| २. | सह सचिव/उपसचिव | S-२७ : १२३१००-२१५९००<br>S-२५ : ७८८००-२०९२०० | ४ |
| ३. | विशेष कार्य अधिकारी | S-२७ : १२३१००-२१५९०० | १ |
| ४. | सहसंचालक (सांख्यिकी) | S-२५ : ७८८००-२०९२०० | १ |
| ५. | अवर सचिव | S-२३ : ६७७००-२०८७०० | १० |
| ६. | कक्ष अधिकारी | S-१७ : ४७६००-१५११००<br>S-२० : ५६१००-१७७५००<br>(४ वर्षाच्या सलग सेवेनंतर) | १९ |
| ७. | प्रकल्प अधिकारी | S-२३ : ६७७००-२०८७०० | १ |
| ८. | उप अभियंता | S-२० : ५६१००-१७७५०० | ३ |
| ९. | एमआयएस को-ऑर्डिनेटर | S-१५ : ४१८००-१३२३०० | मृत संवर्ग |
| १०. | लेखा अधिकारी | S-१६ : ४४९००-१४२४०० | २ |
| ११. | सांख्यिकी अधिकारी | S-१६ : ४४९००-१४२४०० | २ |
| १२. | सहायक कक्ष अधिकारी | S-१६ : ४४९००-१४२४०० | ४० |
| १३. | रोख लेखापाल | S-१६ : ४४९००-१४२४०० | २ |
| १४. | उप लेखापाल | S-१३ : ३५४००-११२४०० | १ |
| १५. | सांख्यिकी सहायक | S-१०: २९२००-९२३०० | १ |
| १६. | सहायक लेखा अधिकारी | S-१४ : ३८६००-१२२८०० | १ |
| १७. | संगणक यंत्र चालक | S-१४ : ३८६००-१२२८०० | १ |
| १८. | वरिष्ठ स्वीय सहायक | S-२४ : ७११००-२११९०० | १ |
| १९. | उच्चश्रेणी लघुलेखक | S-१६ : ४४९००-१४२४०० | ४ |
| २०. | निम्नश्रेणी लघुलेखक | S-१५ : ४१८००-१३२३०० | ६ |
| २१. | लघुटंकलेखक | S-८ : २५५००-८११०० | ३ |
| २२. | लिपिक-टंकलेखक | S-६ : १९९००-६३२०० | ५० |
| २३. | वाहनचालक | S-६ : १९९००-६३२०० | मृत संवर्ग |
| २४. | हवालदार | S-३ : १६६००-५२४०० | मृत संवर्ग |
| २५. | नाईक | S-३ : १६६००-५२४०० | मृत संवर्ग |
| २६. | आवेष्टक | S-३ : १६६००-५२४०० | मृत संवर्ग |
| २७. | चक्रमुद्रक | S-३ : १६६००-५२४०० | मृत संवर्ग |
| २८. | शिपाई | S-१ : १५५००-४७६०० | मृत संवर्ग |
| २९. | वाहनचालक नि सर्वसाधारण सहायक | S-६ : १९९००-६३२०० | मृत संवर्ग |
| | | **एकूण ...** | **१५४** |

**ब) बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या सेवा –**

| अनुक्रमांक | सेवा | मनुष्यबळ संख्या |
|---|---|---|
| १. | वाहनचालक नि सर्वसाधारण सहायक | ५ |
| २. | बहुउद्देशिय गड "ड" कर्मचारी | १७ |
| | एकूण | २२ |

१) वरील तक्ता अ येथील जे संवर्ग मृत ठरविण्यात आले आहेत, त्या संवर्गात कार्यरत कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती / सेवानिवृत्ती/राजीनामा / मृत्यू इ. कारणांमुळे पद रिक्त झाल्यानंतर ते पद आपोआप रद्द होईल.

२) वरील तक्ता ब मध्ये दर्शविलेल्या मनुष्यबळसंख्येच्या मर्यादेत सेवा आवश्यकतेनुसार बाह्ययंत्रणेद्वारे घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. तथापि, उक्त संवर्गात सध्या मृत संवर्ग म्हणून कार्यरत असलेली पदे वगळून उर्वरित मनुष्यबळसंख्येच्या प्रमाणात सेवा बाह्ययंत्रणेकडून घेण्यात याव्यात. उक्त संवर्गात सध्या कार्यरत असलेली पदे जसजशी रिक्त होतील तसतशा त्या सेवा आवश्यकतेनुसार बाह्ययंत्रणेद्वारे घेण्यात येतील.

- **पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या अधिपत्याखलील क्षेत्रिय कार्यालये :-**

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण** | **भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा**

- **पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या योजनांची माहिती:-**

१) अनिवार्य खर्चाच्या योजना - २४

२) कार्यक्रमांतर्गत खर्चाच्या योजना - २६

यासाठीच्या अर्थसंकल्पीय तरतुदीची माहिती तक्ता क्र. ३ येथे पहावी.

तक्ता क्रमांक-३

## पाणी पुरवठा विभागाच्या योजनासाठीच्या अर्थसंकल्पीय तरतुदीची संक्षिप्त माहिती

(रुपये हजारात)

| अ.क्र. तपशील | भारित/ दत्तमत | प्रत्यक्ष खर्चाच्या रकमा २०२४-२०२५ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२०२६ | सुधारित अंदाज २०२५-२०२६ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२६-२०२७ |
|---|---|---|---|---|---|
| १ २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| **प्रधान शीर्षवार सारांश :** | | | | | |
| **ए - महसुली लेख्यावरील खर्च—** | | | | | |
| २०४९, व्याज प्रदाने | भारित | २८०५२४ | ३१३५०० | ३१३५०० | २९७८९१ |
| २२१५, पाणी पुरवठा व स्वच्छता | भारित | ० | १०००१ | ७००१ | ४९९८ |
| | दत्तमत | ४६९०९०२४ | ५६९११८८७ | ७०२७३१३४ | ११२९७८०५१ |
| २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण | दत्तमत | ६० | ९०० | ९०० | १२० |
| २४०६, वनीकरण व वन्यजीवन | दत्तमत | ० | १००० | २०० | ० |
| २७०२, लहान पाटबंधारे | दत्तमत | ४६१०१९ | ५८५४१८ | ५३२५८५ | ६४१८६३ |
| ३४५१, सचिवालयीन - आर्थिक सेवा | दत्तमत | १६४५६९ | ७४६९८१ | १९२४३३ | २२१८१०४ |
| **एकूण - ए - महसुली लेख्यावरील खर्च** | | | | | |
| | **भारित** | **२८०५२४** | **३२३५०१** | **३२०५०१** | **३०२८८९** |
| | **दत्तमत** | **४७५३४६७२** | **५८२४६१८६** | **७०९९९२५२** | **११५८३८१३८** |
| | **एकूण** | **४७८१५१९६** | **५८५६९६८७** | **७१३१९७५३** | **११६१४१०२७** |
| **बी - भांडवली लेख्यावरील खर्च—** | | | | | |
| ४२१५, पाणी पुरवठा व स्वच्छता यावरील भांडवली खर्च. | दत्तमत | ० | ३ | ४९०००३ | २ |
| ४४०२, मृद व जलसंधारण यावरील भांडवली खर्च. | भारित | ० | ५०० | ५०० | ५०० |
| | दत्तमत | २६२४८० | ३८२६२९ | २९९७४७ | ३८०१५० |
| ४७०२, लहान पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च. | दत्तमत | ० | १ | १ | १ |
| **एकूण - बी - भांडवली लेख्यावरील खर्च** | | | | | |
| | **भारित** | **०** | **५००** | **५००** | **५००** |
| | **दत्तमत** | **२६२४८०** | **३८२६३३** | **७८९७५१** | **३८०१५३** |
| | **एकूण** | **२६२४८०** | **३८३१३३** | **७९०२५१** | **३८०६५३** |
| **सी - ऋण शीर्षाखालील खर्च—** | | | | | |
| ६२१५, पाणी पुरवठा व स्वच्छता यासाठी कर्जे. | दत्तमत | ० | १ | १ | १ |
| ७६१०, शासकीय कर्मचारी इत्यादिंना कर्जे. | दत्तमत | ३८९९४ | ८१८१० | ३८९६३ | १०४३७२ |
| **एकूण - सी - ऋण शीर्षाखालील खर्च** | | | | | |
| | **एकूण दत्तमत** | **३८९९४** | **८१८११** | **३८९६४** | **१०४३७३** |
| **स्थूल बेरीज -** | **भारित** | **२८०५२४** | **३२४००१** | **३२१००१** | **३०३३८९** |
| | **दत्तमत** | **४७८३६१४६** | **५८७१०६३०** | **७१८२७९६७** | **११६३२२६६४** |
| | **एकूण** | **४८११६६७०** | **५९०३४६३१** | **७२१४८९६८** | **११६६२६०५३** |

# प्रकरण क्रमांक - ३

## विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांची माहिती

**३.१ महाराष्ट्र जीवन प्राधिकरण :–**

**१) प्राधिकरण स्थापना व तिचा उद्देश–** राज्यातील पाणी पुरवठा कार्यक्रमाचे योजनाबध्द रितीने नियोजन, जलद विकास व उचित संनियंत्रण करण्याच्या दृष्टीने सन १९७६ मध्ये अधिनियमान्वये महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सारण मंडळाची स्थापना करण्यात आली. सन १९९७ मध्ये उपरोक्त अधिनियमांत सुधारणा करण्यात येऊन महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सारण मंडळाचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण असे नामकरण करण्यात आले.

राज्यातील पाणी पुरवठा व मलनिःसारण क्षेत्रातील योजनासंदर्भात संकल्पनेपासून प्रत्यक्ष अंमलबजावणी पर्यंत तसेच आर्थिक नियोजन आणि योजनांची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती या सर्व बाबींमध्ये संपूर्णतः महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा एकात्मिक सहभाग होता.

**२) प्राधिकरणाचा खर्चासाठीची तरतुद :–** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील खर्च प्राधिकरणाच्या उत्पन्नातून करण्यात येतो. यास्तव ज्या यंत्रणेच्या पाणी पुरवठा योजना राबविण्यात येतात त्या यंत्रणेकडून योजना राबविण्याप्रित्यर्थ योजनेवरील आस्थापना, अवजारे आणि अंमलबजावणीच्या खर्चापोटी सर्वसाधारणतः १७.५० टक्के एवढी रक्कम प्राधिकरणाकडून आकारण्यात येते. सदर रकमेतून प्राधिकरणाचा दैनंदिन खर्च/वेतन व अन्य प्रशासकीय खर्च भागविला जात असे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास प्राप्त होत असलेले - इ० ॲण्ड पी० शुल्क वारंवार कमी होत असल्याने, प्राधिकरणातील अधिकारी / कर्मचारी यांचे वेतन व भत्ते तसेच निवृत्तीवेतन यावरील खर्च भागविणे शक्य होत नसल्याने प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांच्या नियमित वेतन भत्यांचे तसेच सेवानिवृत्ती वेतन व भत्याचे दायित्व राज्य शासनाने दिनांक २३ मार्च २०१७ रोजीच्या शासन निर्णयद्वारे स्विकारले आहे. कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते व सेवानिवृत्तीवेतन यांचे दायित्व शासनाने स्विकारल्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास ईटीपी व तांत्रिक शुल्कापोटी प्राप्त होणारे उत्पन्न शासनाकडे दरमहा जमा होणार आहे.

३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणासाठी आकृतीबंधानुसार मंजूर पदांची माहिती तक्ता क्र.— ४ येथे पहावी.

**४) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कामकाजाची संक्षिप्त माहिती :–** प्राधिकरणामार्फत नागरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मागणीनुसार पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी, योजनांचे दैनंदिन परिचलन व देखभाल दुरुस्ती, प्रकल्प सल्लागार सेवा, खाजगी सहभागाचे प्रकल्प संनियंत्रण इत्यादी कामे केली जातात. प्राधिकरणाने केलेल्या कामाची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

I. (४६९ + ३१ ५०० ) नागरी योजना पुर्ण केल्या आहेत.
II. ११६३८ ग्रामीण पाणी पुरवठा योजना पूर्ण केल्या आहेत.
III. ९१ नागरी योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत.
IV. ९२९ ग्रामीण योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत.
V. २३ नागरी पाणी पुरवठा केंद्रांची देखभाल दुरुस्ती करण्यात येत आहे.
VI. २२ ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल व दुरुस्ती करण्यात येत आहे.

**५) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची संरचना :–**

I. मध्यवर्ती व इतर कार्यालये :– मध्यवर्ती कार्यालयामध्ये सदस्य सचिवांचे कार्यालय व त्या अंतर्गत मुख्य प्रशासकीय अधिकारी, संचालक (वित्त), मुख्य अभियंता (म.नि.), अधीक्षक अभियंता (मुख्यालय / समन्वय) अधीक्षक अभियंता गुणवत्ता परिक्षा पथक / अधीक्षक अभियंता, मध्यवर्ती नियोजन संनियंत्रण व संकल्पचित्र कक्ष व अधीक्षक अभियंता (यांत्रिकी - ठाणे व नागपूर), तसेच ६ अंतर्गत लेखा परिक्षण कार्यालय समाविष्ट आहेत.

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | | कार्यालयांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | मध्यवर्ती कार्यालय, सिडको भवन | ... | १ |
| २ | सेंट्रल प्लानींग, डिझाईन ॲड मॉनिटरींग सेल (CPDM) | ... | १ |
| ३ | अधीक्षक अभियंता (यांत्रिकी) | ... | २ |
| ४ | कार्यकारी अभियंता(यांत्रिकी) | ... | १ |
| ५ | महाराष्ट्र पर्यावरण व अभियांत्रिकी प्रशिक्षण व संशोधन संस्था (मीत्रा), नाशिक | | १ |
| ६ | अंतर्गत लेखापरिक्षण कार्यालय | ... | ६ |
| ७ | विभागीय कार्यालय | ... | ५ |

**२. क्षेत्रीय कार्यालये :–**

| अ.क्र. | महसूल प्रादेशिक विभाग | कार्यालये | | | | एकूण कार्यालये |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मुख्य अभियंता | मंडळ | विभाग | उपविभाग | |
| १. | मुख्य अभियंता, प्रा.वि. ठाणे | १ | २ | ७ | २२ | ३२ |
| २. | मुख्य अभियंता, प्रा.वि. पुणे | १ | २ | ७ | ३१ | ४१ |
| ३. | मुख्य अभियंता, प्रा.वि. नाशिक | १ | ३ | ५ | १९ | २८ |
| ४. | मुख्य अभियंता, प्रा.वि. छ. संभाजीनगर | १ | ३ | ७ | २३ | ३४ |
| ५. | मुख्य अभियंता, प्रा.वि. अमरावती | १ | २ | ६ | २१ | ३० |
| ६. | मुख्य अभियंता, प्रा.वि. नागपूर | १ | २ | ५ | १५ | २३ |
| | एकूण ... | ६ | १४ | ३७ | १३१ | १८८ |

## तक्ता क्रमांक ४

## शासन निर्णय दिनांक १८ जून, २०२४ नुसार प्राधिकरणाचा आकृतीबंध

### (अ) नियमित मंजूर पदे

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | मंजूर पदे |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | सदस्य सचिव | भारतीय प्रशासन सेवेतील पद | १ |
| २. | संचालक (तांत्रिक) | एस-२९ : १,३१,१००–२,१६,६०० | १ |
| ३. | मुख्य अभियंता (स्थापत्य) | एस-२९ : १,३१,१००–२,१६,६०० | ६ |
| ४. | अधीक्षक अभियंता (स्थापत्य) | एस-२५ : ७८,८००-२,०९,२०० | |
| | २० % पदांसाठी निवडश्रेणी) | एस-२७ : १,१८,५००-२,१४,१०० | १७ |
| ५. | अधीक्षक अभियंता (यांत्रिकी) | एस-२५ : ७८,८००-२,०९,२०० | |
| | २० % पदांसाठी निवडश्रेणी) | एस-२७ : १,१८,५००-२,१४,१०० | २ |
| ६. | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | एस-२३ : ६७,७००-२,०८,७०० | ५२ |
| ७. | कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) | एस-२३ : ६७,७००-२,०८,७०० | १३ |
| ८. | उप अभियंता (स्थापत्य) | एस-२० : ५६,१००-१,७७,५०० | २१५ |
| ९. | उप अभियंता (यांत्रिकी) | एस-२० : ५६,१००-१,७७,५०० | ४५ |
| १०. | संचालक (वित्त) | एस-२९ : १,३१,१००–२,१६,६०० | १ |
| ११. | उपमुख्य लेखाधिकारी | एस-२५ : ७८,८००-२,०९,२०० | २ |
| १२. | वरिष्ठ लेखाधिकारी / अंतर्गत लेखापरीक्षा अधिकारी | एस-२० : ५६,१००-१,७७,५०० | ९ |
| १३. | मुख्य प्रशासकीय अधिकारी | एस-२५ : ७८,८००-२,०९,२०० | १ |
| १४. | आस्थापना अधिकारी (दक्षता) | एस-२३ : ६७,७००-२,०८,७०० | १ |
| १५. | प्रशासकीय-नि-आस्थापना अधिकारी | एस-२० : ५६,१००-१,७७,५०० | १ |
| १६. | सहायक अभियंता (श्रेणी-२) (स्थापत्य) | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० | १८५ |
| १७. | सहायक अभियंता (श्रेणी-२) (यांत्रिकी) | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० | १४ |
| १८. | कायदा व कामगार अधिकारी | एस-१६ : ४४,९००-१,४२,४०० | १ |
| १९. | लेखा अधिकारी | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० | १० |
| २०. | सहायक लेखाधिकारी | एस-१४ : ३८,६००-१,२२,८०० | २३ |
| २१. | कक्ष अधिकारी / विशेष अधीक्षक | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० | ४ |
| २२. | कार्यासन अधिकारी/अधीक्षक | एस-१४ : ३८,६००-१,२२,८०० | १७ |
| २३. | उच्च श्रेणी लघुलेखक | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० | १० |
| २४. | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | एस-१४ : ३८,६००-१,२२,८०० | |
| | (विहित सेवाकालावधी नंतर) | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० | ५५४ |
| २५. | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | एस-१४ : ३८,६००-१,२२,८०० | |
| | (विहित सेवाकालावधी नंतर) | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० | ४० |
| २६. | विभागीय लेखापाल | एस-१३ : ३५,४००-१,१२,४०० | ४३ |
| २७. | उप लेखापाल | एस-१३ : ३५,४००-१,१२,४०० | ३१ |
| २८. | प्रथम लिपिक | एस-१३ : ३५,४००-१,१२,४०० | ४३ |
| २९. | वरिष्ठ लिपिक | एस-८ : २५,५००-८१,१०० | २६५ |
| ३०. | कनिष्ठ लिपिक / लिपीक-टंकलेखक | एस-६ : १९,९००-६३,२०० | ४३० |
| ३१. | निम्न श्रेणी लघुलेखक | एस-१४ : ३८,६००-१,२२,८०० | २२ |
| ३२. | भांडारपाल | एस-१३ : ३५,४००-१,१२,४०० | १३ |
| ३३. | सहा. भांडारपाल | एस-६ : १९,९००-६३,२०० | ४० |
| ३४. | स्थापत्य अभियांत्रिकी सहायक | एस-८ : २५,५००-८१,१०० | १२८ |
| | | **एकूण नियमित मंजूर पदे** | **२२४०** |

**(ब) बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या सेवा :-**

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | बहुउद्देशीय गट-क सेवा (लिपिक-नि-टंकलेखक) | वाहनचालक | बहुउद्देशीय गट-ड सेवा (शिपाई) | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | मुख्यालय- प्रशासन | ६ | १ | १३ | २० |
| २. | मुख्यालय-वित्त | ५ | १ | १२ | १८ |
| ३. | मुख्यालय तांत्रिक शाखा | १ | २ | ४ | ७ |
| ४. | मुख्यालय अधिक्षक अभियंता कार्यालय | ० | १ | २ | ३ |
| ५. | मध्यवर्ती नियोजन, संकल्पचित्रे व संनियंत्रण कक्ष (CPDM) | १ | १ | २ | ४ |
| ६. | अधिक्षक अभियंता (यांत्रिकी) कार्यालय, ठाणे | ० | १ | २ | ३ |
| ७. | अधिक्षक अभियंता (यांत्रिकी) कार्यालय, नागपुर | ० | १ | २ | ३ |
| ८. | गुणवत्ता नियंत्रण पथक कार्यालय- ठाणे | ० | १ | २ | ३ |
| ९. | गुणवत्ता नियंत्रण पथक कार्यालय- पुणे | ० | ० | १ | १ |
| १०. | गुणवत्ता नियंत्रण पथक कार्यालय- छ. संभाजीनगर | ० | ० | १ | १ |
| ११. | गुणवत्ता नियंत्रण पथक कार्यालय- नागपुर | ० | ० | १ | १ |
| १२. | महाराष्ट्र पर्यावरण व अभियांत्रिकी प्रशिक्षण व संशोधन संस्था (मीत्रा) | ० | १ | ५ | ६ |
| १३. | मुख्य अभियंता यांचे प्रादेशिक कार्यालये | ६ | ६ | ३६ | ४८ |
| १४. | अधिाक्षक अभियंता यांचे मंडळ कार्यालय | १३ | १३ | ६५ | ९१ |
| १५. | कार्यकारी अभियंता यांचे विभाग कार्यालय | १११ | ३७ | १८५ | ३३३ |
| १६. | उप अभियंता यांचे कार्यालय (श्रेणी-१) (एकूण १०४) | ० | १०४ | २०८ | ३१२ |
| १७. | उप अभियंता यांचे कार्यालय (श्रेणी-२) (एकूण २४) | ० | २४ | २४ | ४८ |
| अ) एकूण कार्यालयीन पदे | | १४३ | १९४ | ५६५ | ९०२ |
| ब) पाणीपुरवठा योजनांवरील पदे (शासन निर्णयाच्या परिच्छेद (८) मध्ये नमुद केल्याप्रमाणे) | | | | | ३०५ |
| | | | एकूण | | १२०७ |

**(क) जिल्हा परिषदांकडील पाणी पुरवठा विभागातील नियमित कर्मचारी वर्गाचा तपशील :-**

| अ.क्र. | पदनाम | | ७ व्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी | | मंजूर पदे |
|---|---|---|---|---|---|
| १. | कार्यकारी अभियंता | ... | एस-२३ ६७७००-२०८७०० | ... | ३४ |
| २. | उप अभियंता (स्था) | ... | एस-२० ५६१००-१७७५०० | ... | ३८९ |
| ३. | उप अभियंता (यां) | ... | एस-२० ५६१००-१७७५०० | ... | ६८ |
| ४. | सहाय्यक भूवैज्ञानिक | ... | एस-१९ ५५१००-१७५१०० | ... | ३४ |
| ५. | कनिष्ठ भूवैज्ञानिक | ... | एस-१६ ४४९००-१४२४०० | ... | ६८ |
| ६. | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | ... | एस-१४ ३८६००-१२२८०० | ... | २२६६ |
| ७. | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | ... | एस-१४ ३८६००-१२२८०० | ... | १०२ |
| ८. | सहाय्यक लेखाधिकारी | ... | एस-१४ ३८६००-१२२८०० | ... | ३४ |
| ९. | कक्ष अधिकारी | ... | एस-१४ ३८६००-१२२८०० | ... | ३४ |
| १०. | सहायक आवेदक | ... | एस-८ २५५००-८११०० | ... | ३४ |
| ११. | वरिष्ठ सहाय्यक | ... | एस-८ २५५००-८११०० | ... | ३८९ |
| १२. | वरिष्ठ सहाय्यक लेखा | ... | एस-८ २५५००-८११०० | ... | ३४ |
| १३. | यांत्रिकी | ... | एस-८ २५५००-८११०० | ... | ३४ |
| १४. | रिंगमन | ... | एस-७ २१७००-६९१०० | ... | ३४ |
| १५. | कनिष्ठ सहायक | ... | एस-६ १९९००-६३२०० | ... | ५९३ |
| | | | एकूण मंजूर पदसंख्या ... | ... | ४१४७ |

**(ड) जिल्हा परिषदांकडील बाह्ययंत्रणेमार्फत भरावयाच्या कर्मचारी वर्गाचा तपशील**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | वाहन चालक | ... | ... | ४२३ |
| २. | चतुर्थश्रेणी कर्मचारी (नाईक, परिचर/ शिपाई, चौकीदार,मदतनीस) | ... | ... | ८८० |
| ३. | माहिती शिक्षण व सुसंवाद तज्ञ (MSW) | ... | ... | ३४ |
| ४. | डाटा एन्ट्री ऑपरेटर | ... | ... | ४२३ |
| | | एकूण ... | ... | १७६० |

## तक्ता क्रमांक ५
## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नागरी व ग्रामीण मंडळ
## ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम २०२६-२०२७ (सर्वसाधारण)

(रुपये लाखात)

| अनु-क्रमांक | जिल्हा | सन १९९७-९८ ते २०२४-२५ या कालावधीतील एकूण योजना | पूर्ण झालेल्या योजना | समाविष्ट गावे/वाड्या (संख्या) | योजनेसाठी मार्च २०२५ अखेर झालेला एकूण खर्च | अपूर्ण योजना | अपूर्ण योजनेसाठी मार्च २०२५ अखेर झालेला खर्च | अपूर्ण योजनेसाठी लागणारा आवश्यक निधी २०२५-२६ | सन २०२६-२७ मधील अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १. | ठाणे | २३ | ० | १६२ | २९३९५.४४ | २३ | २९३९५.४४ | ३३४३५.०० | ३३२११.०० |
| २. | रायगड | ३५ | २ | ३८३/६५३ | २८६२२.७३ | ३३ | २७९६०.९० | २१०८२.४१ | २१०८२.४१ |
| ३. | पालघर | २६ | १ | ३२२ | ६६५९४.८८ | २५ | ६६५९४.८८ | ३००९१.१४ | २६४५१.३३ |
| ४. | रत्नागिरी | १९ | ६ | १४३/१०१३ | २१५१६.४३ | १३ | १८६७१.४९ | २४६७.९२ | २०९९७.२२ |
| ५. | सिंधुदूर्ग | १८६ | १८२ | २६३/२१९८ | ३८७२३.२२ | ४ | २८४०५.६४ | ४२६९.०० | ८७७४.६४ |
| ६. | पुणे | २३४ | ११८ | ५२९/२२९४ | ४५९७३.६८ | ११६ | १३८४६४.७६ | ७४४७८.३३ | १२१२९४.०० |
| ७. | सातारा | १८० | १६१ | ४०६ | २७८३९.०८ | १८ | १३२८४.६९ | ८११९.९९ | ३०००.०० |
| ८. | सांगली | ११७ | ८९ | ५० | ७४१९८.०० | २७ | ३२३९.४७ | ५०७६.३७ | २५४१०.१५ |
| ९. | कोल्हापूर | १५३ | १३८ | २०४/२४६ | ३१६५६.९३ | १५ | २२८२३.८७ | २८१०७.७६ | १०६८८.९७ |
| १०. | सोलापूर | ५०७ | ४७९ | १२१४ | ५८१७२.७२ | २३ | ४५७४२.४० | ३०२७१.६० | ३०२७१.६० |
| ११. | नाशिक | ३८ | ० | ४१९ | ६८५७२.५३ | ३८ | ६८५७२.५३ | १४९१७.१२ | २८१६९.०५ |
| १२. | अहिल्यानगर | १४७ | १३३ | ५९४/९०७ | ८७०२१.३८ | ६ | ८७०२१.३८ | १८०.०० | ०.०० |
| १३. | जळगाव | १५० | १५० | ९१ | १४३१६.९८ | ० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| १४. | धुळे | ६० | ६० | १ | २१६९.८७ | ० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| १५. | नंदूरबार | ७ | ७ | ० | ०.०० | ० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| १६. | छ. संभाजीनगर | ११८ | १०६ | ८८८ | ४८०८.११ | १२ | २८९७९.३७ | ३२३७४.०३ | ७४७२७.४२ |
| १७. | बीड | ११० | १०९ | १९७ | १८५६४.९६ | ० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| १८. | जालना | २९७ | २९७ | ० | २२८३१.७७ | ० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| १९. | नांदेड | ५३ | ६८ | ८४/१६ | २५७६.८७ | ३ | ८४७०.७५ | ०.०० | ०.०० |
| २०. | परभणी | ६९ | ६९ | १३६/१ | १७५७४.५८ | ० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| २१. | हिंगोली | ३४ | ३४ | १०७/१४ | ११७५४.१४ | ० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| २२. | लातूर | ७६ | ७६ | १७५/१९ | १४२८०.०० | ० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| २३. | धाराशिव | २८ | ३ | ६३ | २९८५०.५१ | २५ | २९८५०.५१ | १३७७९.३६ | १३७७९.३६ |
| २४. | नागपूर | १७७ | १७२ | २३८/३ | २६०७६.११ | २९ | २१६३९.७६ | ४१५४.७२ | २९४४.७३ |
| २५. | भंडारा | ८१ | ८१ | १६५/६ | १४१७१.६५ | ४ | २९१५.५० | ५९१.०० | १६८.०० |
| २६. | गोंदिया | ५० | ५० | २७७/९५ | १४५७४.५९ | ४ | १३११४.५९ | १०१२०.०० | ५०४२.०० |
| २७. | चंद्रपूर | १५६ | १३८ | ४९०/३ | ३६४०५.२४ | १८ | १४२९०.६९ | ३९५४.७० | १२५४.९६ |
| २८. | गडचिरोली | ५० | ४७ | ९१ | ६५६७.३३ | ३ | २००१.०१ | १६३.०० | ६०.०० |
| २९. | वर्धा | १४६ | १४२ | १४७ | १३९०१.५३ | ४ | ५०१३.४१ | १७७८.३८ | ०.०० |
| ३०. | अमरावती | ७९ | ४१ | १०४५ | १०४२६४.९३ | २६ | १०४१८७.१२ | २०५८२.०० | २९०२७.०० |
| ३१. | यवतमाळ | १३५ | १२७ | २९९/३ | २२९८४.७४ | ८ | ९३९३.०२ | ८२४०.३७ | ३५२३.०१ |
| ३२. | अकोला | १०२ | ८७ | ९१० | ७९६५६.९७ | १५ | ५७२९६.४४ | २०८४५.५३ | २३२०३.४९ |
| ३३. | बुलढाणा | ४२ | १० | ५५१ | ७१७२५.३९ | ३२ | ३९२३८.२४ | ३३४२९.९४ | ३३४२९.९४ |
| ३४. | वाशिम | २६४ | २२३ | २६४ | २४२५१.९१ | १९ | ३४६७.३४ | ३४००.०० | ३४७३.०० |
| | **एकूण** | **३९४९** | **३४०६** | **१०९०८/७४७१** | **११३१५९५.२०** | **५४३** | **८९००३५.२०** | **४०५९०९.६७** | **५१९९८३.२८** |

## ३.२ भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेची माहिती

**१) यंत्रणेची स्थापना :–** महाराष्ट्र शासनाने आंतरराष्ट्रीय विकास संस्थेशी (जागतिक बँक प्रकल्प) केलेल्या कृषी पत प्रकल्प कराराची परिणिती म्हणून भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा दिनांक १६ जुलै, १९७१ पासून अस्तित्वात आली. कृषी विभाग, भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालय तसेच पाटबंधारे विभाग यांचेमार्फत करण्यात येणाऱ्या भूजल सर्वेक्षण व विकास याबाबतची कामे सदर यंत्रणेकडे सोपविण्यात आली. सुरुवातीला ही यंत्रणा भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालयाचा एक घटक होता. परंतु, दिनांक १५ नोव्हेंबर, १९७२ पासून ह्या यंत्रणेला पद्धतशीर व शास्त्रीय तत्वावर खालील योजना कार्यान्वित करण्यासाठी संचालनालयाचा स्वतंत्र दर्जा देण्यात आला :–

(अ) भूजल विषयक सर्वेक्षण करणे.

(ब) भूजलाचे मूल्यांकन, भूजल संवर्धन, भूजल व्यवस्थापन.

**२) संरचना :–** भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेचे मुख्यालय पुणे येथे संचालकांच्या नियंत्रणाखाली आहे. पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, अमरावती व कोकण नवी मुंबई येथे उपसंचालकांची विभागीय कार्यालये असून, त्यांच्या नियंत्रणाखाली त्या विभागातील जिल्हे आहेत. या यंत्रणेची सर्व जिल्ह्यात कार्यालये आहेत.

**३) भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या मुख्यालयात खालील शाखांचा समावेश आहे—**

(अ) सर्वेक्षण शाखा

(ब) संशोधन व विकास कक्ष

(क) जलविज्ञान प्रकल्प

(ड) आवेधन शाखा

### (अ) सर्वेक्षण शाखा

**सर्वेक्षणाच्या प्रमुख योजना—**

**१. सिंचन विहिरींसाठी अर्थसहाय्य :–**

सिंचन विहिरी खोदण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि व ग्रामीण विकास बँकेमार्फत तसेच राष्ट्रीय बँकेमार्फत अर्थसहाय्य दिले जाते. विहीर खोदण्यासाठी जागा निवडीकरिता मार्गदर्शक तत्वे सर्व बँकांना कळविण्यात आली आहेत. तथापि, काही विशिष्ट क्षेत्रात पाणी उपलब्धतेबाबत खात्री नसल्यास अशी प्रकरणे जिल्हा वरिष्ठ भू-वैज्ञानिक कार्यालयाकडे कळविली जातात. त्यानुसार प्रत्यक्ष सर्वेक्षण करून योग्यतेबाबत दाखला दिला जातो. सर्वसाधारणपणे रब्बी हंगामाअखेर विहिरींना पाणी उपलब्ध राहण्याच्या शक्यतेचा अभ्यास करून दाखले देण्यात येतात.

**२. स्थानिक भूजल सर्वेक्षण :–**

जिल्ह्यातील शासकीय, अशासकीय तसेच इतर संस्था अगर वैयक्तिकरित्या मागणी केल्याप्रमाणे प्रत्यक्ष सर्वेक्षण करून भूजल उपलब्धतेचा अहवाल दिला जातो. भूजल सर्वेक्षणासाठी रुपये २५००/- व भूभौतिक सर्वेक्षणासाठी रुपये ५०००/- शुल्क आकारणी केली जात आहे.

**३. वाळू उत्खनन सर्वेक्षण प्रकरणे :–**

नदीतील वाळूचे उत्खनन करतांना अस्तित्वातील भूजल स्त्रोतावर त्याचा परिणाम होतो की नाही, याबाबत जिल्हा वरिष्ठ भू-वैज्ञानिक कार्यालयाकडून सर्वेक्षण करून संबंधित जिल्हाधिकारी यांना दाखले देण्यात येतात. ऑक्टोबर २०२५ अखेरपर्यंत ९४,६०६ प्रकरणे प्राप्त झाली. त्यापैकी ८६,१७६ प्रकरणांचे सर्वेक्षण करून ६४,२९० प्रकरणांचे दाखले जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात आले.

**४. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना :-**

या योजने अंतगर्त अनुसूचीत जाती/जमाती अल्पभूधारक आणि सिमांत शेतकऱ्यांसाठी सिंचन विहीरींचा कार्यक्रम राज्यात राबविण्यात येत आहे. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेकडे माहे ऑक्टोंबर २०२५ अखेर २१५११९ प्रकरणे प्राप्त झाली त्यापैकी १९०४६२ प्रकरणांची प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत.

**५. राज्यातील टंचाई सदृष्य स्थितीचा अभ्यास :-**

दरवर्षी राज्यात माहे ऑक्टोबर अखेर झालेले पर्जन्यमान आणि निरीक्षण विहिरीतील भूजल स्थिर पातळी याचा अभ्यास करून संभाव्य पाणी टंचाई अहवाल, जिल्हा वरिष्ठ भू-वैज्ञानिक यांचेमार्फत तयार करून सदर अहवाल जिल्हाधिकारी यांना सादर केला जातो. या अहवालानुसार माहे ऑक्टोबर ते जून या कालावधीतील टप्पानिहाय (ऑक्टोबरपासून, जानेवारीपासून, एप्रिल ते जून) संभाव्य टंचाई भासणारी गावे/वाड्यांची यादी जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात येते.

### (ब) संशोधन व विकास कक्ष

**१. भूजल उपलब्धता :—**

भूजल मूल्यांकन पाणलोट क्षेत्र संकल्पनेवरच करण्यात येते. राज्यात एकूण १५३८ पाणलोट क्षेत्रे आहेत. ही पाणलोट क्षेत्रे १५ नद्यांच्या उप खोऱ्यात विभागण्यात आलेली आहेत.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार प्रत्येक पाणलोट क्षेत्रातील भूजलाचे वार्षिक पुनर्भरण व उपसा, या बाबींचा अभ्यास करून भूजलाचा अंदाज बांधण्यात येतो. सन २०२५ मध्ये बांधण्यात आलेल्या भूजल मुल्यांकनाचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे—

| | | | |
|---|---|---|---|
| १. | एकूण जिल्हे | — | ३६ |
| २. | एकूण पाणलोट क्षेत्रांची संख्या | — | १,५३८ |
| ३. | एकूण तालुके | — | ३५९ |
| ४. | अस्तित्वातील सिंचन विहिरींची संख्या | — | २४,५१,१३८ |
| ५. | पाण्याची निव्वळ वार्षिक उपलब्धी (दशलक्ष घन मीटर) | — | ३३.११ |
| ६. | पाण्याचा एकूण वार्षिक उपसा (दशलक्ष घन मीटर) | — | १६.५७ |
| ७. | सिंचनासाठी वार्षिक भूजल उपसा (दशलक्ष घन मीटर) | — | ११.५१ |

भूजल मूल्यांकनाच्या आधारे पाण्याचा वार्षिक पुर्नभरणा व उपसा यांच्या टक्केवारीनुसार पाणलोट क्षेत्राचे खालील प्रमाणे् वर्गिकरण करण्यात येत असून राज्यातील भुजल उपसाची सर्वसाधारण टक्केवारी ५१.७९% आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अतिशोषित पाणलोट क्षेत्रे (१०० टक्के उपसा होत आलेले पाणलोट क्षेत्र) | — | ४५ |
| २. | शोषित पाणलोट क्षेत्रे (९० ते १०० टक्के उपसा होत आलेले पाणलोट क्षेत्र) | — | २२ |
| ३. | अंशतः शोषित पाणलोट क्षेत्रे (७० ते १०० टक्के उपसा होत आलेले पाणलोट क्षेत्र) | — | १९८ |
| ४. | सुरक्षित पाणलोट क्षेत्रे (७० टक्के पेक्षा कमी उपसा असलेले) | — | १,२६९ |
| ५. | निकृष्ट गुणवत्ता असलेले पाणलोट क्षेत्रे | — | ४ |

**२. जलवेधशाळा :—**

राज्यात वेगवेगळ्या कृषी हवामान क्षेत्रात व प्रातिनिधिक भूगर्भीय स्थिती असणाऱ्या क्षेत्रातील जलशास्त्रीय व भूजलशास्त्रीय परिमाणांची प्रत्यक्ष मोजणी करून विविध निष्कर्ष काढण्यासाठी व त्यानुसार भूजल अंदाजासाठीचे निकष निश्चित करण्यासाठी १९७४ साली ८ व तद्नंतर २ अशा एकूण १० जलवेधशाळांची स्थापना करण्यात आली असून, तेथे जलशास्त्रीय व भूजल शास्त्रीय परिमाणांची मोजणी दरवर्षी करण्यात येते.

**३. महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन)–अधिनियम २००९ :–**

पुरवठा व मागणी व्यवस्थापन उपाययोजनांमार्फत वापरकर्त्यांच्या विविध प्रवर्गाकरिता विहित दर्जाच्या भूजलाचा कायम, समन्यायी आणि पुरेसा पुरवठा सुकर करणे आणि त्याची खातरजमा करणे, सार्वजनिक पिण्याच्या स्त्रोतांचे जतन करणे आणि महाराष्ट्र राज्यात भूजलाच्या समुपयोजनांचे सामुहिक सहभागाने व्यवस्थापन व विनियमन करण्यासाठी राज्य भूजल प्राधिकरण आणि जिल्हास्तरीय प्राधिकरणे स्थापन करणे, त्यांच्याशी संबंधीत व अनुषंगीक बाबींची तरतूद करणे या सर्वकष प्रयोजनास्तव महाराष्ट्र राज्यामध्ये महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग-४ दिनांक ३ डिसेंबर २०१३ (२०१३ चा अधिनियम क्र. २६) अन्वये अधिसूचना जारी होऊन महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम २००९ हा कायदा, दिनांक १ जून २०१४ पासून राज्यात लागू झालेला आहे.

महाराष्ट्र भूजल विकास व व्यवस्थापन अधिनियम २००९ च्या प्रभावी अंमलबजावणीकरिता तांत्रिक समन्वयाची जबाबदारी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेवर सोपविण्यात आली असून, यंत्रणेस खालील महत्वाच्या जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत.

(१) मूळ पाणलोट क्षेत्र किंवा जलप्रस्तर शोधून काढणे व त्यांचा आराखडा करणे.

(२) सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे प्रभाव क्षेत्र शोधणे व त्याचा आराखडा तयार करणे.

(३) भूजल वापर योजना तयार करणे.

(४) एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास व व्यवस्थापन योजना तयार करणे.

(५) सर्व स्तरीय समित्यांना तांत्रिक सहाय्य करणे.

उपरोक्त सर्व स्तरीय समित्या व भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडे अधिनियमाअंतर्गत सोपविण्यात आलेली कार्य पार पाडण्यासाठी राज्य शासन आवश्यकतेनुसार भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांना अनुदान व आगाऊ रकमा उपलब्ध करून देतील अशी तरतूद या अधिनियमात करण्यात आली आहे.

## (क) राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्प

जलविज्ञान प्रकल्प टप्पा–२ चा पुढील टप्पा म्हणजेच **राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्प** आहे. राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्प हा जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने राबविण्यात येत आहे. या प्रकल्पातील महाराष्ट्र भूजल या घटकाची अंमलबजावणी करण्यासाठी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा ही अंमलबजावणी यंत्रणा आहे. सदरील प्रकल्प हा ८ वर्षाच्या कालावधीसाठी असून त्यास रुपये २७.०० कोटीची केंद्र शासनाची मान्यता मिळालेली होती. प्रकल्प सुरु झाल्यापासुन राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्पामध्ये मार्च २०२५ अखेर एकूण २२.५२७९ कोटी निधी खर्ची टाकण्यात आलेला आहे.

**भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेचा आकृतीबंध तक्ता क्र. ६ येथे पहावा.**

**तक्ता क्र. ६**

**आस्थापना शाखा**

## संचालनालय, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेचा आकृतीबंध

| अनुक्रमांक<br>१ | पदाचे नाव<br>२ | ७ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी<br>३ | मंजूर पदसंख्या<br>४ |
|---|---|---|---|
| १. | आयुक्त | संवर्ग पद | १ |
| २. | अतिरिक्त संचालक | एस-२७ : १,१८,५००-२,१४,१०० | १ |
| ३. | सहसंचालक | एस-२६ : ८२,२००-२,११,५०० | २ |
| ४. | सहसंचालक (अभियांत्रिकी) | एस-२६ : ८२,२००-२,११,५०० | १ |
| ५. | उपसंचालक | एस-२३ : ६७,७००-२,०८,७०० | ८ |
| ६. | मुख्य खोदन अभियंता | एस-२३ : ६७,७००-२,०८,७०० | २ |
| ७. | वरिष्ठ भूवैज्ञानिक | एस-२२ : ६०,०००-१,९०,८०० | ५४ |
| ८. | मुख्य भूभौतिक तज्ञ | एस-२३ : ६७,७००-२,०८,७०० | १ |
| ९. | वरिष्ठ खोदन अभियंता | एस-२२ : ६०,०००-१,९०,८०० | ७ |
| १०. | वरिष्ठ भूभौतिक तज्ञ | एस-२१ : ५७,१००-१,८०,८०० | ६ |
| ११. | वरिष्ठ रसायनी | एस-२१ : ५७,१००-१,८०,८०० | १ |
| १२. | सहायक संचालक (मवि व लेसे) | एस-२० : ५६,१००-१,७७,५०० | १ |
| १३. | प्रशासन अधिकारी | एस-२० : ५६,१००-१,७७,५०० | १ |
| १४. | उपअभियंता (यांत्रिकी) | एस-२० : ५६,१००-१,७७,५०० | ८ |
| १५. | सहायक भूवैज्ञानिक | एस-१९ : ५५,१००-१,७५,१०० | १०२ |
| १६. | सहायक भूभौतिक तज्ञ | एस-१६ : ४४,९००-१,४२,४०० | ७ |
| १७. | कनिष्ठ भूवैज्ञानिक | एस-१६ : ४४,९००-१,४२,४०० | १३५ |
| १८. | सहायक रसायनी | एस-१६ : ४४,९००-१,४२,४०० | ७ |
| १९. | सहायक प्रशासन अधिकारी | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० | ६ |
| २०. | लेखा अधिकारी | एस-१६ : ४४,९००-१,४२,४०० | ७ |
| २१. | सहायक अभियंता (स्थापत्य) प्रतिनियुक्तीने | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० | १ |
| २२. | सिस्टीम ॲनालिस्ट | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० | १ |
| २३. | कनिष्ठ भूभौतिक तज्ञ | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० | १३ |
| २४. | कनिष्ठ रसायनी | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० | १६१ |
| २५. | लघुलेखक (उच्च श्रेणी) | एस-१६ : ४४,९००-१,४२,४०० | २ |
| २६. | उपलेखापाल (वित्त विभाग) | एस-१३ : ३५,४००-१,१२,४०० | ४२ |
| २७. | तांत्रिक अधिकारी | एस-१३ : ३५,४००-१,१२,४०० | ४२ |
| २८. | लघुलेखक (निम्नश्रेणी) | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० | १२ |
| २९. | कार्यालय अधीक्षक | एस-१३ : ३५,४००-१,१२,४०० | ८ |
| ३०. | कनिष्ठ अभियंता | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० | २४ |
| ३१. | प्रोग्रामर | एस-१४ : ३८,६००-१,२२,८०० | १ |
| ३२. | भौगोलिक माहिती प्रणाली अधिकारी | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० | ७ |
| ३३. | भौगोलिक माहिती प्रणाली वरिष्ठ सहायक<br>(४ वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर) | एस-१० : २९,२००-९२,३००<br>एस-१४ : ३८,६००-१,२२,८०० | ४१ |
| ३४. | वरिष्ठ लिपिक | एस-८ : २५,५००-८१,१०० | ५३ |
| ३५. | लघुटंकलेखक | एस-८ : २५,५००-८१,१०० | ११ |
| ३६. | सहाय्यक आवेधक | एस-८ : २५,५००-८१,१०० | ३२ |
| ३७. | दोरखंडवाला (रिंगमन) | एस-७ : २१,७००-६९,१०० | १६ |
| ३८. | भौगोलिक माहिती प्रणाली सहाय्यक<br>(७ वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर) | एस-७ : २१,७००-६९,१००<br>एस-८ : २५,५००-८१,१०० | ७६ |
| ३९. | कनिष्ठ लिपिक | एस-६ : १९,९००-६३,२०० | १०५ |
| ४०. | प्रयोगशाळा सहाय्यक | एस-६ : १९,९००-६३,२०० | ७ |
| | | **एकूण गट--अ, ब, क** | **१,०१३** |

# प्रकरण क्रमांक - ४

## पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या योजनांची माहिती :—

### ४.१ जल जीवन मिशन :—

**प्रस्तावना —**

सन २००९-२०१० पासून केंद्र शासन पुरस्कृत सुरू असलेल्या राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची जल जीवन मिशनमध्ये समाविष्ट करून पुनर्रचना करण्याचे केंद्र शासनाने ठरविले आहे. यापूर्वीच्या राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची पुनर्रचना करून सन २०१९ पासून जल जीवन मिशनची सुरुवात करण्यात आली आहे. जल जीवन मिशनबाबत केंद्र शासनाने, दिनांक २५ डिसेंबर, २०१९ रोजी मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेस अनुसरुन राज्यात जल जीवन मिशन राबविण्याचा निर्णय राज्य मंत्रीमंडळाच्या दिनांक ८ जुलै, २०२० रोजीच्या बैठकीत घेण्यात आला असून त्याआधारे राज्यात जल जीवन मिशन राबविण्याकरिता दिनांक ४ सप्टेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

त्यानुसार राज्यातील जल जीवन मिशनच्या अंमलबजावणीकरिता यापूर्वीच्या पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेचे विलिनीकरण करून राज्य पाणी व स्वच्छता मिशनची स्थापना करण्यात आली आहे. त्यासोबतच जिल्हास्तरावर जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन व ग्रामपातळीवर ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती असणार आहे. जल जीवन मिशनचे मुख्यालय बेलापूर, नवी मुंबई येथे असून मिशन संचालक हे त्याचे प्रमुख आहेत.

**१. उद्दिष्ट :—**

ग्रामीण भागातील सर्व कुटुंबांना सन २०२४ पर्यंत "हर घर नल से जल" (FHTC–Functional Household Tap Connection) प्रमाणे पाणी पुरवठा करण्यास शासन कटिबध्द आहे. सन २०२४ पर्यंत राज्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक घरात वैयक्तिक नळ जोडणीद्वारे दरडोई किमान ५५ लिटर प्रती दिन, गुणवत्तापूर्ण पाणी पुरवठा करणे हे जल जीवन मिशनचे प्रमुख उद्दिष्ट आहे. यात फक्त योजना पूर्ण करणे एवढाच उद्देश नसून कार्यक्षम पाणी पुरवठ्याची एक शाश्वत सेवा उपलब्ध करणे हा त्यामधील प्रमुख गाभा आहे. सदर जल जीवन मिशन योजना ५० : ५० टक्के केंद्र व राज्य हिश्श्याने राबविण्यात येते. जल जीवन मिशन योजनेअंतर्गत आतापर्यंत झालेली प्रगती आणि सुरु असलेल्या कामांचा विचार करता मा. अर्थमंत्री, केंद्र सरकार यांनी २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पामध्ये जल जीवन मिशनचा कालावधी डिसेंबर, २०२८ पर्यंत वाढविण्याची घोषणा केली आहे. त्यानुसार केंद्रिय जल शक्ती मंत्रालयाच्या दिनांक १६ जून, २०२५ च्या पत्रान्वये जल जीवन मिशन कार्यक्रमास डिसेंबर, २०२८ पर्यंत मुदतवाढ देण्याचे विचाराधीन असल्याचे व याबाबत सक्षम स्तरावरुन मंजूरी मिळाल्यानंतर केंद्र शसनाकडुन राज्यांना निधी वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे कळविले आहे. तसेच पाणी हा विषय राज्य सूची अंतर्गत येत असल्याने जोपर्यंत केंद्र शासनाकडुन निधी प्राप्त होत नाही, तोपर्यंत राज्यांनी स्वतःच्या निधीमधुन जल जीवन मिशनच्या योजनांची अंमलबजावणी सुरु ठेवण्याबाबत कळविले आहे.

**२. जल जीवन मिशनसाठी संस्थात्मक यंत्रणा :—**

जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचना दिनांक २५ डिसेंबर, २०१९ रोजी केंद्र शासनाने निर्गमित केल्या असून हा एक कालमर्यादित कार्यक्रम आहे. विहित कालावधीत उद्दिष्टपूर्ती करण्याचे लक्ष्य असल्याने यासाठी मजबूत चार स्तरीय संस्थात्मक संरचना तयार करण्यात आली आहे :—

(१) राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय जल जीवन मिशन (NJJM)
(२) राज्य स्तरावर राज्य पाणी व स्वच्छता मिशन (राज्य पाणी व स्वच्छता मिशन)
(३) जिल्हा स्तरावर जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन (DWSM)
(४) ग्राम पातळीवर ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती (VWSC)

**३. कृती आराखडा :—**

जल जीवन मिशन अंतर्गत राज्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला पिण्याच्या पाण्याची सुरक्षा (Drinking Water Security) देण्यासाठी प्रत्येक घरात कार्यात्मक नळ जोडणीद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येणार आहे. पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता ही किमान भारतीय दर्जा – BIS : १०,५०० अशी असावी असे अपेक्षित केले आहे.

जल जीवन मिशन अंतर्गत प्रत्येक कुटुंबास सन २०२४ पर्यंत घरगुती नळ जोडणीद्वारे पाणी पुरवठा सुविधा उपलब्ध करून द्यावयाची आहे. यानुसार गाव कृती आराखडा (VAP), जिल्हा कृती आराखडा (DAP) व राज्य कृती आराखडा (SAP) तयार करण्यात येतात. सदर कृती आराखड्यामध्ये द्यावयाच्या नियोजित घरगुती नळ जोडण्याचे व त्याकरिता आवश्यक असणाऱ्या निधीचे त्रैमासिक व वार्षिक नियोजन असते. यामध्ये अंमलबजावणी सहाय्य संस्था (ISA), ग्रामीण पाणी पुरवठा विभाग/उपविभाग किंवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या मदतीने सदर कार्यवाही पूर्ण करण्यात येते.

**४. जल जीवन मिशन अंतर्गत योजनांची अंमलबजावणी :—**

जल जीवन मिशनमध्ये पुढील प्रकारच्या योजनांचा समावेश कराण्यात येतो.

४.१ ज्या योजना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (NRDWP) अंतर्गत सुरू आहेत, अशा योजनांची सुधारणात्मक पुनर्जोडणी (Retrofitting) ५५ LPCD प्रमाणे करून कार्यात्मक नळ जोडणी करणे. तसेच गावांमध्ये स्टँड पोस्ट नळ पाणी योजना आहेत, अशा गावांमध्ये स्टँड पोस्टपासून प्रत्येक कुटुंबापर्यंत/घरापर्यंत कार्यात्मक नळजोडणी देण्यासाठी पूर्वीच्या योजनांची सुधारणात्मक पुनर्जोडणी (Retrofitting) करणे.

४.२ पूर्ण झालेल्या योजनांच्या बाबतीत ४० LPCD ऐवजी ५५ LPCD पाणी पुरवठा करण्याच्या अनुषंगाने अशा योजनांची सुधारणात्मक पुनर्जोडणी (Retrofitting) करणे.

४.३ ज्या गावांमध्ये पिण्यायोग्य मुबलक भूजल (किंवा अन्य पर्यायाद्वारे) उपलब्ध आहे, अशा गावांमध्ये स्वतंत्र योजना घेणे.

४.४ ज्या गावांमध्ये मुबलक भूजल (किंवा अन्य पर्यायाद्वारे) पाणीसाठा उपलब्ध आहे, मात्र पाण्याची गुणवत्ता योग्य नाही, अशा गावांमध्ये जल शुद्धीकरणाच्या प्रकल्पासह स्वतंत्र योजना घेणे.

४.५ ज्या गावांमध्ये पाण्याचे प्रमाण कमी आहे, अशा गावांसाठी प्रादेशिक/अनेक गाव योजना (Water Grid) घेणे.

४.६ आदिवासी भागात नळ पाणी पुरवठा सोय नसलेल्या आदिवासी गावे/वाड्या/पाडे यांना कायमस्वरुपी पाणी पुरवठा करून प्रत्येक घरात कार्यात्मक नळजोडणीद्वारे नळपाणी पुरवठा करणे, जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचनांनुसार शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा, शासकीय वसतिगृहे, अंगणवाडी इत्यादी करिता सदर योजनेतून नळ जोडणी देणे. तसेच एकाकी/आदिवासी वाडी/पाड्याकरिता सौर ऊर्जा आधारित नळ पाणी पुरवठा योजना राबविणे.

४.७ दलित वस्तीमधील सर्व घरांना कार्यात्मक नळ जोडणीसह पाणी पुरवठा देणे व योजनेच्या लाभार्थ्यांची स्वतंत्र माहिती ठेवणे. स्वतंत्र योजनेसाठी जास्तीत जास्त १८ महिन्यांचा व अनेक गाव योजनांसाठी ३६ महिन्यांचा कालावधी अनुज्ञेय राहील.

जिल्ह्यातील पाणी पुरवठा योजनांसाठी प्रशासकीय मान्यता देण्यासंदर्भात राज्य पाणी व स्वच्छता मिशनकडून जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनला वित्तीय मर्यादेचे अधिकार प्रदान केले जातात. पाणी पुरवठा योजनेच्या अंमलबजावणी दरम्यान आणि अंतिम देयक अदायगी करण्यापूर्वी जल जीवन मिशन च्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे त्रयस्थ संस्थेमार्फत तपासणी करण्यात येईल.

**५. राज्य पाणी व स्वच्छता मिशन (SWSM) :—**

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील योजनांसाठी या विभागामार्फत दिनांक १० फेब्रुवारी, २०१० रोजी संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अंतर्गत राज्य पाणी व स्वच्छता मिशनची नोंदणी करण्यात आली आहे. या मिशनमध्ये मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली शिखर समिती आहे. जल जीवन मिशन व स्वच्छता विषयक कार्यक्रमांचे राज्यातील नियोजन, अंमलबजावणी, संनियंत्रण याबाबत संपूर्ण जबाबदारी व अधिकार राज्य पाणी व स्वच्छता मिशनला आहेत. जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे राज्य पाणी व स्वच्छता मिशनला कार्य करण्याचे संपूर्ण अधिकार आहेत. राज्य पाणी आणि स्वच्छता मिशनला जल जीवन मिशनसाठी कार्यान्वयन यंत्रणा म्हणून कार्य करण्यासाठी व केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले आहे.

राज्य पाणी आणि स्वच्छता मिशन साठी आवश्यक प्रतिनियुक्तीच्या पदांच्या वेतन व अनुषंगिक बाबींचा वार्षिक खर्च जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्य शासनाला करावा लागणार असल्याने प्रतिनियुक्तीच्या पदांच्या वेतन व भत्त्यापोटी येणाऱ्या खर्चाकरिता राज्य हिश्श्याच्या निधीमध्ये आवश्यक ती वार्षिक तरतूद करण्यात येते. तसेच जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचनांनुसार केंद्र शासनाने सूचविलेल्या मनुष्यबळाव्यतिरिक्त आवश्यकतेप्रमाणे अन्य मनुष्यबळ संस्थेस, बाह्य संस्थेद्वारे उपलब्ध करून घेता येईल. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, मिशनच्या कालावधीत मिशनसाठी आवश्यक असलेली राज्य/जिल्हा/तालुका स्तरावरील पदे बाह्ययंत्रणेमार्फत भरण्याबाबतचे अधिकार राज्य पाणी व स्वच्छता मिशनच्या शिखर समितीला आहेत. मात्र त्याचा खर्च हा जल जीवन मिशन मधून प्राप्त होणाऱ्या सहाय्यकृत बाबींसाठी असलेल्या प्रमाणाच्या मर्यादेत राहणे आवश्यक आहे.

**६. जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन (DWSM) :—**

जिल्ह्यातील जल जीवन मिशनच्या संपूर्ण अंमलबजावणीसाठी जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन जबाबदार असेल. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम ७९ (अ) नुसार प्रत्येक जिल्हा परिषदेमध्ये स्थापन केलेल्या जिल्हा जल व्यवस्थापन व स्वच्छता समितीला जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन म्हणून कार्य करण्यास या विभागाच्या दिनांक ७ सप्टेंबर, २०११ च्या शासन परिपत्रकान्वये मान्यता देण्यात आली आहे.

(अ) जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन करिता १ उपमुख्य कार्यकारी अधिकारी, १ लेखाधिकारी, १ कार्यालय अधीक्षक व १ लिपिक याप्रमाणे जिल्हा परिषद स्तरावर प्रत्येकी ४ पदे (एकूण १३६) जल जीवन मिशन कालावधीसाठी कार्यरत आहेत. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता) हे जिल्हा प्रकल्प संचालक म्हणून काम पाहतील. या पदांच्या वेतन/भत्त्यापोटी येणारा वार्षिक खर्च जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्य शासनाला करावा लागणार असल्याने प्रतिनियुक्तीच्या पदांच्या वेतन व भत्त्यापोटी येणारा खर्च आवश्यक त्या वार्षिक खर्चातून करण्यात येतो.

(ब) त्याचप्रमाणे जिल्हा स्तरावरील व तालुका स्तरावरील सद्यःस्थितीत कार्यरत असलेल्या कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा) आणि उप अभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा) यांच्या आस्थापनेवरील एकूण अधिकारी/कर्मचारी हे जल जीवन मिशनचा भाग म्हणून काम करतील. वरील अधिकारी/कर्मचाऱ्यांचे वेतन व अनुषंगिक भत्ते सद्यःस्थितीप्रमाणे विभागाच्या आस्थापनेवरच होईल.

**जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनची नव्याने खालीलप्रमाणे पुनर्रचना करण्यात येत आहे.**

(१) जिल्हाधिकारी ... ... ... ... ... : अध्यक्ष
(२) मुख्य कार्यकारी अधिकारी ... ... ... ... ... : सह अध्यक्ष
(३) जिल्हा आरोग्य अधिकारी ... ... ... ... ... : सदस्य
(४) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) ... ... ... ... ... : सदस्य
(५) प्रकल्प संचालक, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प ... ... ... : सदस्य
(६) अधीक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग ... ... ... : सदस्य
(७) अधीक्षक कृषी अधिकारी, कृषी विभाग ... ... ... ... : सदस्य
(८) उप वन संरक्षक ... ... ... ... ... : सदस्य
(९) जिल्हा माहिती अधिकारी ... ... ... ... ... : सदस्य
(१०) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ... ... ... ... : सदस्य
(११) वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा प्रमुख ... ... ... : सदस्य
(१२) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) तथा प्रकल्प संचालक, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष : सदस्य
(१३) कार्यकारी अभियंता, ग्रा. पा. पु. वि., जिल्हा परिषद... ... ... ... : सदस्य सचिव

**(ब) मा. पालकमंत्री यांच्या स्तरावरील समिती—**

(१) मा. जिल्हा पालकमंत्री ... ... : अध्यक्ष

(२) जिल्ह्यातील मा. मंत्री (सर्व) ... ... : सदस्य

(३) जिल्हा मा. खासदार ... ... : सदस्य

(४) मा. पालकमंत्री यांनी नेमलेले जिल्ह्यातील ३ मा. आमदार : सदस्य

(५) मा. जिल्हा परिषद अध्यक्ष ... ... : सदस्य

(६) जिल्हाधिकारी ... ... : सदस्य

(७) मुख्य कार्यकारी अधिकारी ... ... : सदस्य सचिव

**७. राज्यस्तरीय समिती :—**

जल जीवन मिशनचे जिल्हास्तरीय आराखडे, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनच्या मान्यतेनंतर, त्या जिल्ह्याचे मा. पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीसमोर सादर करण्यात येतील. या समितीमध्ये त्या जिल्ह्यांमधील सर्व मंत्री, तसेच मा. पालकमंत्री यांनी नेमलेले ३ आमदार हे सदस्य असतील. या समितीच्या सहमतीनंतर सदर आराखडे हे राज्य स्तरावरील समितीपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात येतील, राज्यपातळीवर मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता), मा. राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता), अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता) व मिशन संचालक, राज्य पाणी व स्वच्छता मिशन यांची समिती (राज्यस्तरीय योजना मंजुरी समितीच्या मान्यतेनंतर) आराखड्यांना अंतिम मान्यता देईल.

**८. ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती (VWSC) :—**

ग्राम पंचायत अधिनियम, १९५९ अंतर्गत स्थापित ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे पदसिद्ध अध्यक्ष सरपंच असून ग्रामसेवक पदसिद्ध सदस्य सचिव आहेत. **ही समिती जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कार्यान्वित नळजोडणीद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी योजनांचे नियोजन, अंमलबजावणी आणि देखभाल दुरुस्ती करेल. हा या योजनेचा गाभा आहे.** याद्वारे गावातील सदस्यांनी पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीची व ती प्रदीर्घ काळापर्यंत चालू राहील याची जबाबदारी आवश्यक आहे. ग्राम पाणी पुरवठा व्यवस्थापनासाठी ग्रामपंचायत स्तरावर जल जीवन मिशन आणि सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (PFMS) च्या मार्गदर्शक सूचनांनुसार बँक खाते असेल आणि जल जीवन मिशन आणि सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (PFMS) च्या मार्गदर्शक सूचना आणि ग्रामपंचायत लेखा संहितेनुसार त्याचे आर्थिक व्यवहार करण्यात येतील. ही समिती जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे काम करेल.

**ग्राम पाणी पुरवठा समितीची कर्तव्ये व जबाबदाऱ्या ठळक बाबी पुढीलप्रमाणे आहेत :—**

(१) गावातील सर्व कुटुंबांना घरगुती नळ जोडणी देण्याची संपूर्ण जबाबदारी ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची असेल.

(२) गाव कृती आराखडा तयार करणे, गावातील पाणी पुरवठा योजनांचे नियोजन, रचना, अंमलबजावणी, देखभाल-दुरुस्ती इ. ची जबाबदारी ही ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची असेल.

(३) राज्य पाणी व स्वच्छता मिशकनडून मध्यवर्ती निविदा प्रक्रियेनुसार निवडण्यात आलेल्या संस्थांकडून/पुरवठादारांकडून बांधकाम सेवा/वस्तू/ साहित्य प्राप्त करून घेणे व त्या संस्थेकडून योजना राबवून घेणे.

(४) त्रयस्थ संस्थेकडून होणाऱ्या योजनेच्या तपासणी व कार्यक्षमता मूल्यांकनाची व्यवस्था करणे.

(५) योजनांचे सामाजिक लेखापरीक्षण हाती घेणे.

(६) गावातील पाणी पुरवठा योजनेच्या पायाभूत सुविधाच्या भांडवली किंमतीच्या ५ टक्के किंवा १० टक्के लोकवर्गणी (आर्थिक/श्रमदान स्वरूपात) देण्याबाबत गावकऱ्यांना प्रोत्साहीत करणे. पाणीपट्टी आकारणे व वसुली करणे.

वरील ठळक बाबींसह केंद्र शासनाच्या इतर मार्गदर्शक सूचनेप्रमाणे ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती इतरही कामे करतील.

**९. अंमलबजावणी सहाय्य संस्था (ISA) :—**

गावातील पाणी पुरवठा व स्वच्छता समितीला सहाय्य करण्यासाठी अंमलबजावणी सहाय्य संस्थांची (Implementation Support Agencies-ISA) महत्वाची भूमिका राहणार आहे. या संस्थेची निवड केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे राज्य पाणी व स्वच्छता मिशन करेल. ग्रामीण भागात प्रभावीपणे कार्यरत असणाऱ्या ग्रामीण संघटना (VO), महिला बचतगट (SHG), समुदाय आधारित संघटना (CBO), सार्वजनिक विश्वस्त मंडळ (Charitable Trust) किंवा इतर ग्रामीण भागात काम करणाऱ्या पायाभूत संस्था यांना (ISA) अंमलबजावणी सहाय्य संस्था म्हणून निवड करण्यात येईल. राज्य पाणी पुरवठा मिशनचे नियुक्त केलेल्या ISA कडून काम करून घेण्याची जबाबदारी DWSM व SWSM ची आहेत. अंमलबजावणी सहाय्य यंत्रणेच्या (ISA–Implementing Support Agency) सहकार्याने प्रत्येक गावाचा "गाव कृती आराखडा" (VAP) तयार करण्याचे व अंमलबजावणी करण्याचे काम ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती करेल.

**१०. माहिती शिक्षण व संवाद (IEC) :—**

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत राज्य पाणी व स्वच्छता मिशनमार्फत राबविण्यात येणाऱ्या जल जीवन मिशनमध्ये ग्रामीण जनतेचा व्यापक लोकसहभाग सुनिश्चित करण्यासाठी प्रचार व प्रसिद्धी करिता माहिती शिक्षण व संवाद उपक्रम राबविले जातात. विविध माध्यमांसाठी आवश्यक असलेले दृकश्राव्य, श्राव्य, प्रिंट प्रचार व प्रसिद्धी साहित्याची निर्मिती करून विविध माध्यमांद्वारे जल जीवन मिशनची माहिती ग्रामीण भागातील जनतेपर्यंत देण्यात येते. केंद्र व राज्य स्तरावरून राबविण्यात येणाऱ्या अभियान विषयक मोहिमांची प्रचार, प्रसिद्धी व अंमलबजावणी करण्यात येते. या विविध माध्यमांद्वारे गाव पातळीवर व्यापक जनजागृती व ग्रामीण जनतेचे वैयक्तिक व सामूहिक वर्तणूक बदल करण्यासाठी या माध्यमांचा समर्पकपणे वापर करण्यात येतो.

यामध्ये योजना निरंतर व शाश्वत चालू राहण्यासाठी ग्रामीण भागात जनतेच्या मानसिकतेत बदल घडविणे आवश्यक आहे. त्यामध्ये प्रामुख्याने ग्रामीण भागातील कुटुंबाना पिण्याच्या पाण्याचे महत्त्व, नळ जोडणीकरिता कुटुंबाना प्रेरित करणे, पाण्याचा योग्य वापर, पाणी बचत, स्रोतांचे बळकटीकरण, पाऊस पाणी संकलन, लोकवर्गणी जमा करणे, पाणी पट्टी भरणे, स्थानिक कारागिरांचे गुण कौशल्ये विकसित करणे, पाणी गुणवत्ता तपासणी, योजनेचे संचालन, देखभाल व दुरुस्ती यामध्ये समुदाय सहभाग या विषयांवर माहिती, शिक्षण व संवाद या उपक्रमाअंतर्गत ग्रामीण भागात चळवळ उभी करण्यासाठी तयार केलेल्या प्रचार व प्रसिद्धी साहित्याचा प्रभावी वापर करण्यात येत आहे.

**११. प्रशिक्षण व क्षमता बांधणी :—**

जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांचे परिचलन, देखभाल व दुरुस्ती व योजनांची शाश्वतता तसेच योजना चिरकाळ टिकविणेसाठी ग्रामस्तरावरील भागधारकांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. त्याअनुषंगाने राज्याच्या माध्यमातून ग्रामस्तरावरील भागधारकांसाठी (स्तर- ३) विविध बाबींच्या अनुषंगाने राष्ट्रीय जल जीवन मिशन मार्फत निवड करण्यात आलेल्या मुख्य संसाधन केंद्रामार्फत क्लस्टर स्तरावर विविध प्रशिक्षणे आयोजित केली जातील. सदर प्रशिक्षणांचे वेळोवेळी सनियंत्रण जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष व राज्य पाणी व स्वच्छता मिशन कक्षाच्या मार्फत केले जाईल.

**१२. कौशल्य विकास प्रशिक्षण (नल जल मित्र कार्यक्रम) :—**

नल जल मित्र मल्टी स्किलीग आर पी एल मॉडेल या घटकांतर्गत ग्रामपंचायत स्तरावर कुशल प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध होणेकरीता, पाणीपुरवठा योजनेमध्ये सातत्यपूर्ण पाणी पुरवठा करण्याच्या अनुषंगाने व योजनेची शाश्वतता व गुणवत्ता पूर्ण देखभाल दुरुस्ती करण्यासाठी राज्यात मोठ्या प्रमाणात कुशल मनुष्यबळाची जसे की १. प्लंबर व गवंडी, २. इलेक्ट्रिशियन व पंप ऑपरेटर, ३. फिटर व मोटर मेकॅनिक या विषयाच्या ग्रामपंचायती स्तरावर ट्रेड संबंधित प्रशिक्षण देवून कुशल मनुष्यबळ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कौशल्य विकास प्रशिक्षण राबविणे.

यामध्ये योजना निरंतर व शाश्वत चालू राहण्यासाठी ग्रामीण भागात जनतेच्या मानसिकतेत बदल घडविणे आवश्यक आहे. त्यामध्ये प्रामुख्याने ग्रामीण भागातील कुटुंबाना पिण्याच्या पाण्याचे महत्त्व, नळ जोडणीकरिता कुटुंबाना प्रेरित करणे, पाण्याचा योग्य वापर, पाणी बचत, स्रोतांचे बळकटीकरण, पाऊस पाणी संकलन, लोकवर्गणी जमा करणे, पाणी पट्टी भरणे, स्थानिक कारागिरांचे गुण कौशल्ये विकसित करणे, पाणी गुणवत्ता तपासणी, योजनेचे संचालन, देखभाल व दुरुस्ती यामध्ये समुदाय सहभाग या विषयांवर माहिती, शिक्षण व संवाद या उपक्रमाअंतर्गत ग्रामीण भागात चळवळ उभी करण्यासाठी तयार केलेल्या प्रचार व प्रसिद्धी साहित्याचा प्रभावी वापर करण्यात येत आहे.

**१३. आर्थिक बाबी :—**

या मिशनसाठी केंद्र राज्य हिस्सा ५०:५० याप्रमाणे राहणार आहे. अनुसूचित जाती/जमातीच्या लोकसंख्येप्रमाणे निधी राखीव ठेवण्यात येईल. राज्यामध्ये जल जीवन मिशन राबविण्यासाठी एकूण रु. ७०,४६४.५२ कोटी (केंद्र व राज्य) इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे. हे अंदाज ढोबळमानाने काढण्यात आले असून प्रत्यक्ष योजनेवरील खर्च त्या त्या योजनेच्या प्रशासकीय मान्यतेप्रमाणे खर्च करण्यात येईल.

उपरोक्त रकमेपैकी ५० टक्के हिस्सा व त्याचप्रमाणे प्रतिनियुक्तीवरील पदाच्या वेतन व भत्त्यासाठी आवश्यक निधी राज्य शासनाकडून अर्थसंकल्पित करण्यात येतील. सन २०२४ पर्यंत जल जीवन मिशन अंतर्गत देखील राज्याला ५० टक्के वाटा उपलब्ध करून देणे अनिवार्य आहे. त्यामध्ये अनुसूचित जाती विशेष योजना व आदिवासी उपयोजना याकरिता निधीची तरतूद करण्यात येईल. याबाबतचे प्रस्ताव राज्य पाणी व स्वच्छता मिशन राज्य शासनास विहीत वेळेत सादर करेल.

एकूण निधीपैकी ५ टक्के निधी सहाय्यकृत बाबीसाठी व २ टक्के निधी पाणी गुणवत्ता व सर्वेक्षण कार्यक्रमासाठी राखीव असेल. प्रत्येक राज्याने सन २०२४ पर्यंत प्रत्येक वर्षांत देण्यात येणाऱ्या नळ जोडण्यांची संख्या व त्या अनुषंगाने येणारा खर्च यांची माहिती असणारा राज्य कृती आराखडा तयार करणे आवश्यक आहे.

राज्य पाणी व स्वच्छता मिशनकडून ग्रामपंचायतीला जल जीवन मिशन अंतर्गत आवश्यकतेप्रमाणे निधीची उपलब्धता करता येईल, यासाठी आमदार/ खासदार (स्थानिक विकास कार्यक्रम) निधी, सीएसआर किंवा इतर सामाजिक संस्थांमार्फत निधी उपलब्ध करता येईल. पाणी पुरवठा योजनांकरिता खासदार निधीतून प्राप्त रक्कम केंद्र हिस्सा म्हणून तर आमदार निधीतून प्राप्त रक्कम राज्याचा हिस्सा ग्राह्य धरली जाईल.

**१४. ग्रामपंचायतींचे १०% सामुदायिक योगदान :—**

गावामध्ये नव्याने जल जीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजना सुरू करण्यासाठी किमान ८० टक्के कुटुंबांकडून गावातील पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या एकूण भांडवली खर्चापैकी १० टक्के (डोंगराळ/वन भागामध्ये किमान ५ टक्के व अनुसूचित जाती / जमाती लोकसंख्या असलेल्या क्षेत्रासाठी किमान ५ टक्के) लोकवर्गणी गोळा होणे अनिवार्य आहे. ही वर्गणी जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक तत्वानुसार रोख रकमेमध्ये किंवा श्रमदानाद्वारे अदा करता येईल, योजना पूर्ण झाल्यानंतर योजना यशस्वीरित्या चालविणे आणि पाणीपट्टी वसूल करून या योजनेची देखभाल दुरुस्ती योग्य रीतीने करणाऱ्या ग्रामपंचायतीस पुढील ५ वर्षाच्या काळात टप्याटप्याने, जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक तत्वानुसार, गावांतर्गत पाणी पुरवठा योजनेच्या पायाभूत प्रकल्पाच्या भांडवली खर्चाच्या १० टक्के रक्कम प्रोत्साहनपर मिळेल.

**१५. आर्थिक नियोजन व निधी व्यवस्थापन :—**

(१) जल जीवन योजना केंद्र व राज्य हिश्श्याने खालीलप्रमाणे राबविण्यास शासनाची मान्यता देण्यात आली आहे.

(२) जल जीवन मिशन अंतर्गत समावेश घटक व उपघटक आणि त्याचे निधीचे प्रमाण खालीलप्रमाणे आहे.

| अनु-क्रमांक | घटक | केंद्र / राज्य निधीचे प्रमाण | वापर |
|---|---|---|---|
| (अ) | • व्याप्ती (Coverage) म्हणजे हर घर नल से जल याबाबत पायाभूत सुविधांसाठी (ग्रामीण कुटुंबांना कार्यरत घरगुती नळजोडणी देण्याच्या दृष्टीने). | ५० : ५० | घरगुती नळजोडणी देण्याच्या दृष्टिने करण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा योजनांचे बांधकाम. |
| | • सहाय्यकृत बाबी (Support Activities) | ६० : ४० | अंमलबजाबणी सहाय्य संस्थेअंतर्गत समाज संघटन करणे. माहिती, शिक्षण व संवाद, मनुष्यबळ विकास, प्रशिक्षण व कौशल्य विकास, माहिती केंद्र, त्रयस्थ तपासणी यंत्रणा, संसाधन केंद्र, स्थानिक समुदाय एकत्रिकरण, कार्यशाळा, आढावा बैठक, अभ्यास दौरा, (IMIS) संबंधित सुविधा. |
| | • पाणी गुणवत्ता संनियंत्रण आणि सर्वेक्षण कार्यक्रम (WQMS). | ६० : ४० | पाणी नमुने तपासणी, प्रयोगशाळा इत्यादी च्या अनुषंगिक बाबी. |
| (ब) | पाणी गुणवत्ता उपमिशन (NWQSM) | ५० : ५० | फ्लोराईडबाधित गावे/वाड्यांच्या पाणी पुरवठा योजनांचे बांधकाम. |
| (क) | प्रतिनियुक्तीवरील अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन | ० : १०० | राज्य हिस्सा. |

गावांतर्गत कामांसाठी योजनेसाठी लोकवर्गणी घेण्यात येऊन सदर लोकवर्गणी रोख रक्कम किंवा वस्तू किंवा श्रमदान या स्वरूपात घ्यावयाची आहे. यासाठी ग्रामपंचायत/ ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष व सचिव यांनी संयुक्तिकरित्या स्वतंत्र बँक खाते उघडण्यात यावे.

(३) तसेच योजनेसाठी प्राप्त लोकवर्गणी व देखभाल दुरुस्तीसाठी केलेली पाणीपट्टी वसुली याबाबत स्वतंत्रपणे नोंदवही (Ledger) ठेवण्यात यावी.

(४) योजनेचे व्यवस्थापन संपूर्णपणे सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीवर करण्यात येते.

(५) पाणी पुरवठा योजना पूर्ण झाल्यानंतर व परीक्षण पूर्ण झाल्यानंतर खर्चाचे वित्तीय लेखापरीक्षण करून योजना ग्रामपंचायतीस हस्तांतरण करण्यात येते.

(६) ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती कार्यान्वित नळजोडणीद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी योजनांचे नियोजन, अंमलबजावणी आणि देखभाल दुरुस्ती करेल. हा या योजनेचा गाभा आहे. याद्वारे गावातील सदस्यांनी पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीची व ती प्रदिर्घ काळापर्यंत चालू राहील याची जबाबदारी घेणे आवश्यक आहे.

**तक्ता क्रमांक ७**

**जल जीवन मिशन अंतर्गत पाणी गुणवत्ता बाधित गावे/वाड्यांची दिनांक १ एप्रिल २०२५ रोजी व सन २०२४-२०२५ मध्ये साध्य केलेल्या गावे/वाड्यांची संख्या (IMIS वरील माहितीनुसार)**

| अ.क्र. | जिल्हा | दि. १ एप्रिल २०२४ रोजी पाणी गुणवत्ता बाधित गावे/वाड्यांची संख्या | | सन २०२४-२०२५ मध्ये साध्य केलेल्या गावे/वाड्यांची संख्या | | दि. १ एप्रिल २०२५ रोजी पाणी गुणवत्ता बाधित गावे/वाड्यांची संख्या | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Chemical contaminated villages | Bacteriological contaminated villages | Chemical contaminated villages | Bacteriological contaminated villages | Chemical contaminated villages | Bacteriological contaminated villages |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| १. | पालघर | १० | १३८ | ६ | ४३ | ०४ | ९५ |
| २. | ठाणे | २० | ४४ | २ | २० | १८ | २४ |
| ३. | रायगड | १० | ५० | ... | १० | ६६ | ४० |
| ४. | रत्नागिरी | ७ | २२० | ४ | ११७ | ३ | १०३ |
| ५. | सिंधुदूर्ग | ४७ | १७० | ३८ | ७५ | ९ | ९५ |
| | **कोकण विभाग** | **९४** | **६२२** | **५०** | **२६५** | **१००** | **३५७** |
| ६. | पुणे | २३३ | ३६१ | ... | ८ | २५८ | ३५३ |
| ७. | सातारा | ९९ | १८६ | ६६ | ७८ | ३३ | १०८ |
| ८. | सांगली | १३० | ८४८ | ७९ | १५३ | ५१ | ६९५ |
| ९. | सोलापूर | ११६७ | ५५७ | ५९ | ७९ | ११०८ | ४७८ |
| १०. | कोल्हापूर | ५४ | ४५१ | २० | ९३ | ३४ | ३५८ |
| | **पुणे विभाग** | **१६८३** | **२४०३** | **२२४** | **४११** | **१४८४** | **१९९२** |
| ११. | नाशिक | ५११ | ७४७ | ६६ | ५३ | ४४५ | ६९४ |
| १२. | धुळे | ३२ | १०८ | ... | १४ | ४५ | ९४ |
| १३. | नंदूरबार | ५८ | ३१९ | २१ | ३३ | ३७ | २८६ |
| १४. | जळगाव | २६४ | २६५ | ११३ | ४६ | १५१ | २१९ |
| १५. | अहमदनगर | ११० | ४४८ | ५६ | ७७ | ५४ | ३७१ |
| | **नाशिक विभाग** | **९७५** | **१८८७** | **२५६** | **२२३** | **७३२** | **१६६४** |
| १६. | संभाजीनगर | ४८४ | १२१८ | १०७ | ४२९ | ३७७ | ७८९ |
| १७. | जालना | २९५ | ११२ | ९४ | ... | २०१ | १५१ |
| १८. | परभणी | ५३५ | ४७५ | ९१ | ११ | ४४४ | ४६४ |
| १९. | हिंगोली | ३५२ | ३६७ | १८ | २०१ | ३३४ | १६६ |
| २०. | नांदेड | १४८० | २०३२ | ४४१ | ५१४ | १०३९ | १५१८ |
| २१. | धाराशिव | १२७ | ५९८ | ... | ... | २६८ | ६३८ |
| २२. | बीड | १११ | १११९ | ५७ | ११८ | ५४ | १००१ |
| २३. | लातूर | १९६ | ३९६ | ७८ | ९३ | ११८ | ३०३ |
| | **औरंगाबाद विभाग** | **३५८०** | **६३१७** | **८८६** | **१३६६** | **२८३५** | **५०३०** |
| २४. | अमरावती | १४३ | १७९ | १०६ | ११२ | ३७ | ६७ |
| २५. | अकोला | १२३ | ३० | २८ | ... | ९५ | ४८ |
| २६. | वाशिम | ६७ | ६९ | ३९ | ... | २८ | ८४ |
| २७. | बुलढाणा | २७१ | १८२ | १७४ | ९९ | ९७ | ८३ |
| २८. | यवतमाळ | ८६७ | ४९५ | ३८३ | ७२ | ४८४ | ४२३ |
| | **अमरावती विभाग** | **१४७१** | **९५५** | **७३०** | **२८३** | **७४१** | **७०५** |
| २९. | नागपूर | १२९१ | ४०४ | ६३६ | १२७ | ६५५ | २७७ |
| ३०. | वर्धा | ६० | १२ | २४ | ... | ३६ | २० |
| ३१. | भंडारा | ९४३ | २७९ | ६४७ | २१२ | २९६ | ६७ |
| ३२. | गोंदिया | ११५ | २८४ | ७१ | ९० | ४४ | १९४ |
| ३३. | चंद्रपूर | ५८ | ४३ | ४४ | ... | १४ | ५३ |
| ३४. | गडचिरोली | १५३ | २२० | ११५ | ८७ | ३८ | १३३ |
| | **नागपूर विभाग** | **२६२०** | **१२४२** | **१५३७** | **५१६** | **१०८३** | **७४४** |
| | **एकूण** | **१०४२३** | **१३४२६** | **३६८३** | **३०६४** | **६९७५** | **१०४९२** |

# ४.२ ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम

**१. फ्लॅगशिप योजना :—**

फ्लॅगशिप योजना ही केंद्र शासनामार्फत राबविण्यात येत असून त्या अंतर्गत महाराष्ट्र राज्याच्या १६ योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यामध्ये या विभागाच्या खालील **दोन** योजनांचा समावेश आहे.

१.१ **राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम** : सन २००९-२०१० पासून केंद्र शासन पुरस्कृत सुरु असलेला **''राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम''** जल जीवन मिशनमध्ये समाविष्ट करून, पुनर्रचना करण्याचे केंद्र शासनाने ठरविले आहे. यानुसार ग्रामीण भागातील सर्व कुटुंबांना सन २०२४ पर्यंत "हर घर जल" (FHTC – Functional Household Tap Connection) प्रमाणे पाणी पुरवठा करण्यास शासन कटिबद्ध आहे. सन २०२४ पर्यंत राज्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक घरात वैयक्तिक नळ जोडणीद्वारे दरडोई किमान ५५ लिटर प्रती दिन, गुणवत्तापूर्ण पाणी पुरवठा करणे हे जल जीवन मिशनचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

या अंतर्गत प्रत्येक व्यक्तीस, स्वयंपाकासाठी आणि घरगुती वापरासाठी शुध्द व पुरेसा आणि शाश्वत पाणी पुरवठा सर्वकाळ आणि सर्व परिस्थितीत सोयीच्या ठिकाणी उपलब्ध करून देणे हे उद्दिष्ट आहे. या फक्त योजना पूर्ण करणे एवढाच उद्देश नसून कार्यक्षम पाणी पुरवठ्याची एक शाश्वत सेवा उपलब्ध करणे हा त्यामधील प्रमुख गाभा आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जल जीवन मिशनची राज्यात अंमलबजावणी करणे आणि मिशन अधिकाधिक परिणामकारक होण्याकरिता सध्या अस्तित्वातील अंमलबजावणीसाठीच्या प्रचलित कार्यपध्दती व निकषांमध्ये सुधारणा करण्याबाबत शासन निर्णय क्र. जजीमि–२०१९/प्र.क्र. १३८/पापु-१० (०७), दिनांक ४ सप्टेंबर, २०२० अन्वये निर्णय घेण्यात आला आहे. विहित कालावधीत उद्दिष्टपूर्ती करण्याचे लक्ष्य असल्याने यासाठी मजबूत चार स्तरीय संस्थात्मक संरचना तयार करण्यात आली आहे, ती अशी—

(१) राष्ट्रीय स्तरावर "राष्टीय जल जीवन मिशन" (NJJM)

(२) राज्य स्तरावर राज्य पाणी व स्वच्छता मिशन (SWSM)

(३) जिल्हा स्तरावर जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन (DWSM)

(४) ग्राम पातळीवर ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती (VWSC)

१.२ **स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) :—**

केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक तत्वानुसार केंद्र पुरस्कृत ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम सन २०००-२००१ पासून राबविण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला आहे. दिनांक १ एप्रिल २०१२ पासून या कार्यक्रमाचे निर्मल भारत मिशन (ग्रामीण) व त्यानंतर दिनांक २ ऑक्टोबर २०१४ पासून स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) असे पुनर्नामांकन करण्यात आले आहे. दिनांक १८ एप्रिल, २०१८ रोजी राज्यातील सर्व ३४ जिल्हे, ३५१ पंचायत समित्या व २७,६६७ ग्रामपंचायती हगणदारी मुक्त झाल्याबाबत घोषणा करण्यात आली आहे. केंद्र शासनाने जुलै–२०२० मध्ये स्वच्छ भारत मिशन टप्पा–२ च्या मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. तसेच, केंद्र शासनाने स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) टप्पा–२ या योजनेस दि. ३१ मार्च, २०२७ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. त्यानुसार संपूर्ण ग्रामीण स्वच्छता व शाश्वत स्वच्छता टिकविण्याच्या अनुषंगाने स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) दुसऱ्या टप्प्यांतर्गत ग्रामीण भागातील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनेचे नियोजन करण्यात येत आहे.

**२. ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाचे स्वरूप :—**

२.१ राज्य शासनाने ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासंबंधात सन २०००–२००१ पासून सुधारित धोरण राबविण्यास सुरुवात केली. त्यापूर्वी पुरवठा आधारित एकूण १००४८८ गावे/वाड्या आहेत. सन २०११ च्या जनगणनेनुसार राज्यातील एकूण ११.२३ कोटी लोकसंख्येपैकी ग्रामीण लोकसंख्या ६.६१४ कोटी म्हणजेच ५५ टक्के आहे. राज्याचा १/३ भाग पर्जन्यछायेत येतो. परंतु याच भागात जास्त पाणी लागणारी पिके घेतली जातात. कोकण प्रदेश हा अति पावसाचा प्रदेश आहे. परंतु उतार व सच्छिद्र खडकामुळे पाण्याची साठवणूक होऊ शकत नाही. तसेच या भागात भरपूर व उथळ भूगर्भ साठे आहेत. सदर भाग नैसर्गिक, रासायनिक प्रदूषणग्रस्त आहे.

२.२ पाणी ही मूलभूत गरज असल्याने, केंद्र शासनाने व राज्य शासनाने ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमास प्रथम प्राधान्य दिलेले आहे.

२.३ साध्या विहिरी, विंधण विहिरी, लघु पाणी पुरवठा योजना, नळ पाणी पुरवठा योजना, अशा उपाययोजनांद्वारे ग्रामीण भागात पिण्याचे पाणी उपलब्ध करण्यात आले आहे. तथापि, प्रत्येक गावात पाणी पुरवठा योजना असूनही वाढती लोकसंख्या, प्रत्येक वर्षी पडणारा अपुरा पाऊस, शेतीसाठी भूगर्भातील व भूपृष्ठावरील पाण्याचा अनिर्बंध वापर, तसेच पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत अनेक कारणांमुळे दूषित होवू लागल्याने, पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेत घट झाली. यामुळे, पिण्यासाठी पुरेसे पाणी पुरविण्याबरोबरच ते शुध्द स्वरूपात पुरविण्यालाही प्राधान्य देण्यात आले आहे. पावसाळ्यानंतर पिण्याच्या पाण्याची टंचाई भासणाऱ्या गावांना पाणी पुरवठा करण्यासाठी विशेष उपाययोजना घेण्यात येतात. त्याचप्रमाणे दुषित पाणी पुरवठा असलेल्या भागाला शुद्ध पाणी पुरवठा करण्यासाठी उपाययोजना करण्यात येतात.

२.४ शासन निर्णय क्रमांक–जजीमी–२०१९/प्र.क्र. १३८/पापु–१० (०७), दि. ४ सप्टेंबर, २०२० सुधारित धोरणानुसार आता हा कार्यक्रम मागणी आधारित व समूह सहभाग या तत्वानुसार राबविण्यात येत आहे. ग्रामीण भागातील जनतेला दरडोई दरदिवशी ५५ लिटर या प्रमाणात शुद्ध स्वरुपात पिण्याचे पाणी या कार्यक्रमाद्वारे उपलब्ध केले जाते. नवीन पाणी पुरवठा योजना घेताना त्यामध्ये १०० टक्के घरगुती नळ जोडण्यांचा समावेश अनिवार्य करण्यात आला आहे.

२.५ राज्यामध्ये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या प्रभावी कार्यान्वयनासाठी राज्यातील सर्व प्रादेशिक व स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजनांद्वारे पुरविण्यात येणाऱ्या पाण्याचे वापरानुसार मोल अदा करण्याची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी सर्व घरगुती व बिगर घरगुती नळ जोडणी धारकांसाठी मीटर पद्धती लागू करण्यात आली आहे.

## ३. ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाचे धोरण :—

३.१ राज्य शासनाने ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासंबंधात सन २०००–२००१ पासून सुधारित धोरण राबविण्यास सुरुवात केली. त्यापूर्वी पुरवठा आधारित धोरणात कार्यक्रम लोकाभिमुख नव्हता. त्यामुळे कार्यक्रम अपेक्षेप्रमाणे यशस्वी होऊ शकला नाही. मागील धोरणातील त्रुटी विचारात घेऊन त्यात आवश्यक सुधारणा करून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सुधारित धोरण आता राज्यात राबविले जात आहे.

३.२ सुधारित धोरणानुसार हा कार्यक्रम मागणी आधारित व समूह सहभाग या तत्वानुसार राबविला जात आहे. या धोरणानुसार योजना निश्चितीपासून ते योजनेच्या अंमलबजावणीच्या प्रत्येक टप्प्यात व व्यवस्थापनात लोकांचा सक्रीय सहभाग ग्रामसभेद्वारे अनिवार्य केला असून योजनेच्या भांडवली खर्चाचा १० टक्के भाग लाभार्थ्यांची लोकवर्गणी म्हणून खर्च होते. परंतु, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची किंमत पाहता, योजनेची लोकवर्गणी भरणे ग्रामस्थांना/स्थानिक स्वराज्य संस्थांना अवघड होऊ लागले आहे. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी आकारली जाणारी लोकवर्गणी जमा करण्यामध्ये खूप अडचणी येत असल्याचे शासनाचे निदर्शनास आले. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र राज्याकरीता मंजूर निधी व गत काही वर्षातील मंजूर ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा आढावा घेण्यात आला असता असे निदर्शनास आले आहे की, गत तीन वर्षापेक्षा अधिक कालावधीतील रखडलेल्या योजनांपैकी बहुतांश योजना लोकवर्गणी अभावी व लोकवर्गणीशी निगडीत असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या प्रश्नांमुळे रखडलेल्या आहेत. लोकवर्गणीच्या अटीमुळे योजना राबविण्यास विलंब होत असून केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा निधी पर्याप्त प्रमाणात खर्च होवू शकत नाही. त्यामुळे केंद्र व राज्य शासनाचा प्राप्त झालेला निधी मोठ्या प्रमाणावर अखर्चित राहत आहे. या बाबींचा विचार करून मंत्रीमंडळाच्या मान्यतेने दि. ९ जुलै, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी आकारण्यात येत असलेली लोकवर्गणी पुर्णतः रद्द करण्यात आली आहे. तथापि, यापूर्वी ज्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांकरीता पूर्णतः अथवा अंशतः लोकवर्गणीची रक्कम जमा केलेली असेल अशी लोकवर्गणीची रक्कम संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेस अथवा अंमलबजावणी यंत्रणेस परत केली जाणार नाही व अशा पाणी पुरवठा योजनांमधील उर्वरित लोकवर्गणीची रक्कम योजनांच्या किंमतीमध्ये समाविष्ट करण्यात येईल, अशी तरतूद शासन निर्णयात करण्यात आलेली आहे.

**३.३ पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या, शासन निर्णय क्रमांक जजीमि-२०१९/प्र.क्र. १३८/पापु-१०(०७), दिनांक ४ सप्टेंबर, २०२० अन्वये जल जीवन मिशन अभियानांतर्गत निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांमधील प्रमुख तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत :-**

३.३.१ ज्या योजना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (NRDWP) अंतर्गत सुरु आहेत, अशा योजनांची सुधारणात्मक पुनर्जोडणी (Retrofitting) किमान ५५ LPCD प्रमाणे करून कार्यात्मक घरगुती नळ जोडणी करणे, तसेच ज्या गावांमध्ये स्टँड पोस्ट नळ पाणी पुरवठा योजना आहेत, अशा गावांमध्ये स्टँड पोस्टपासून प्रत्येक कुटुंबापर्यंत/घरापर्यंत घरगुती कार्यात्मक घरगुती नळ जोडणी देण्यासाठी पूर्वीच्या योजनांची सुधारणात्मक पुनर्जोडणी (Retrofitting) करणे.

३.३.२ पूर्ण झालेल्या योजनांच्या बाबतील ४० LPCD ऐवजी किमान ५५ LPCD पाणी पुरवठा करण्याच्या अनुषंगाने अशा योजनांची सुधारणात्मक पुनर्जोडणी (Retrofitting) करणे.

३.३.३ ज्या गावांमध्ये पिण्यायोग्य मुबलक भूजल (किंवा अन्य पर्यायाद्वारे) उपलब्ध आहे, अशा गावांमध्ये स्वतंत्र योजना घेणे.

३.३.४ ज्या गावांमध्ये मुबलक भूजल (किंवा अन्य पर्यायाद्वारे) पाणीसाठा उपलब्ध आहे, मात्र पाण्याची गुणवत्ता योग्य नाही, अशा गावांमध्ये जल शुध्दीकरणाच्या प्रकल्पासह स्वतंत्र योजना घेणे.

३.३.५ ज्या गावांमध्ये पाण्याचे प्रमाण कमी आहे, अशा गावांसाठी प्रादेशिक/अनेक गाव योजना (Water Grid) घेणे.

३.३.६ आदिवासी भागात नळ पाणी पुरवठा सोय नसलेल्या आदिवासी गावे/वाड्या/पाडे यांना कायमस्वरूपी पाणी पुरवठा करून प्रत्येक घरात कार्यात्मक नळजोडणीद्वारे पाणी पुरवठा करणे, जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचनांनुसार शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा, शासकीय वसतिगृहे, अंगणवाडी इत्यादी करिता सदर योजनेतून नळ जोडणी देणे. तसेच एकाकी/आदिवासी वाडी/पाड्यांकरिता सौर ऊर्जा आधारित नळ पाणी पुरवठा योजना राबविणे.

३.३.७ दलित वस्तीमधील सर्व घरांना कार्यात्मक नळ जोडणीद्वारे पाणी पुरवठा देणे व योजनेच्या लाभार्थ्यांची स्वतंत्र माहिती ठेवणे.

**३.४ ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा वार्षिक कृती आराखडा तयार करताना खालीलप्रमाणे गावांना प्राधान्य देण्यात येते.**

३.४.१ योजना मंजूर करताना मागील तीन वर्षात टँकर्सद्वारे पाणी पुरवठा केलेल्या गावांना प्राधान्य देणे.

३.४.२ १०० टक्के हागणदारी मुक्त झालेली गावे.

३.४.३ ४० लिटर प्रती दिन पेक्षा कमी पाणी पुरवठा होत असलेली गावे.

३.४.४ १० लिटर प्रती दिन पेक्षा कमी पाणी पुरवठा होत असलेल्या गावांना कृती आराखड्यात सर्वोच्च प्राधान्य देणे.

३.४.५ ज्या गावांमध्ये पाणी पुरवठा योजना नाहीत अशा गावांचा कृती आराखड्यात समावेश करणे.

३.४.६ अस्तित्वातील पाणी पुरवठा योजना वाढत्या लोकसंख्येमुळे अपुरी पडत असलेली गावे.

३.४.७ ज्या गावांमधील अस्तित्वातील पाणी पुरवठा योजना कालबाह्य झालेल्या आहेत, अशा गावांचा कृती आराखड्यात समावेश करणे.

**३.५ महाराष्ट्र राज्यात राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची अंमलबजावणी करतांना राज्य शासनामार्फत घेण्यात आलेल्या काही महत्वाच्या धोरणात्मक निर्णयांची तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे आहे :–**

**३.५.१ ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या दरडोई खर्चाच्या निकषात वाढ :—**

शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-२०१८/प्र.क्र.१८१/पापु-०७, दिनांक २९.०६.२०२२ अन्वये केंद्र शासन पुरस्कृत जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या वर्गवारीत बदल करण्यात आली असल्याने या योजनांच्या दरडोई खर्चाच्या निकषात सुधारणा करुन खालील प्रमाणे दरडोई खर्चाच्या दरास मान्यता दिली आहे.

| अ.क्र. | योजनेचा प्रकार | दरडोई खर्च (GST) वगळून |
|---|---|---|
| १. | प्रादेशिक पाणी पुरवठा योजना (MVS) - ज्यामध्ये भूपृष्ठावरील (Surface water) पाण्यावर प्रक्रिया करुन शुध्द पाणी पुरवठा करणे प्रस्तावित आहे. | रु. ८१११/- |
| २. | स्वतंत्र पाणी पुरवठा योजना (SVS) ज्यामध्ये भूपृष्ठावरील (Surface water) पाण्यावर प्रक्रिया करुन शुध्द पाणी पुरवठा करणे प्रस्तावित आहे. | रु.५८२१/- |
| ३. | स्वतंत्र पाणी पुरवठा योजना (SVS) भूजल (Ground Water) वर पाणी पुरवठा करणे प्रस्तावित आहे. | रु.४३९०/- |

**४. जल जीवन मिशन कार्यक्रमाची अंमलबजावणी- :—**

(१) पाणी पुरवठा योजनांच्या विशिष्ट उपांगाचे (पाण्याची टाकी, पंप हाऊस इ.) संभाव्य संकल्प चित्र, आराखडे व त्यांची अंदाजपत्रके (भौगोलिक क्षेत्र आणि तेथील भौगोलिक परिस्थितीनुसार) राज्य पाणी व स्वच्छता मिशनकडून तयार करून उपलब्ध करून देण्यात येतील. त्याप्रमाणे सर्व यंत्रणांनी या आराखड्यानुसार पुढील कार्यवाही करावी.

(२) पाणी पुरवठा योजनेसाठी लागणाऱ्या दर्जेदार (भारतीय मानांकनाप्रमाणे) बांधकाम व अभियांत्रिकी साहित्य/यंत्रसामुग्रीचा (पाईप, विद्युत पंप, वॉल्व्हस्, सिमेंट स्टील वगैरे) आवश्यकतेप्रमाणे दरकरार करणे/एजन्सी नेमणे इ. कार्यवाही राज्य पाणी व स्वच्छता मिशनद्वारे करण्यात येईल. या दरपत्रकावर आधारित अंदाजपत्रके व आराखडे सर्व यंत्रणांनी करावेत.

(३) राज्य पाणी व स्वच्छता मिशनच्या कार्यकारी समितीमार्फत पाणी पुरवठा योजनांच्या जलद अंमलबजावणीसाठी मध्यवर्ती निविदा प्रक्रियेद्वारे नामांकित बांधकाम संस्था व पुरवठादार यांचे जिल्ह्यांसाठी पॅनेल तयार करण्यात येईल. जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन या पॅनेलमधून पाणी पुरवठा योजना करण्यासाठी एका योजनेकरिता एका संस्थेची निवड करेल. मात्र ग्राम पातळीवरील योजनांसाठी अशी निवड करतांना जिल्हा समिती, ग्राम पाणी समितीला विश्वासात घेऊन/विचारविनिमय करून अंमलबजावणी संस्थेची निवड करेल.

(४) जिल्ह्यातील पाणी पुरवठा योजनांसाठी प्रशासकीय मान्यता देण्यासंदर्भात राज्य पाणी व स्वच्छता मिशनकडून जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनला वित्तीय मर्यादेचे अधिकार प्रदान केले जातील.

(५) पाणी पुरवठा योजनेच्या अंमलबजावणी दरम्यान आणि अंतिम देयक अदायगी करण्यापूर्वी जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे त्रयस्थ संस्थेमार्फत तपासणी करण्यात येईल. राज्य पाणी व स्वच्छता मिशनच्या कार्यकारी समितीमार्फत नेमलेल्या त्रयस्थ तपासणी संस्थांचे पॅनेल मधील संस्थांमार्फत जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनकडून या गावांच्या योजनांची त्रयस्थ तपासणी करण्यात येईल.

(६) स्वतंत्र योजनेसाठी जास्तीत जास्त १८ महिन्यांचा व अनेक गाव योजनांसाठी ३६ महिन्यांचा कालावधी अनुज्ञेय राहील. ज्या योजना पूर्ण करण्यास ३ वर्षाचा कालावधी लागणार आहे, अशा योजनांचे कार्यादेश/कार्यारंभ आदेश/करार (Contract) अंमलबजावणीकरिता मार्च, २०२२ पूर्वी देण्यात यावेत, यानुसार गाव कृती आराखडा (VAP) व जिल्हा कृती आराखडा (DAP) तयार करण्यात यावा.

**५. जल जीवन मिशनः–**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यातील पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था यांचे विलीनीकरण करून एकंदर ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी राज्य पाणी व स्वच्छता मिशनची स्थापना करण्यात आली आहे. सदर मिशनचे मुख्यालय सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई येथे आहे.

**५.१ राज्य पाणी व स्वच्छता मिशन –**

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील योजनांसाठी या विभागामार्फत दि.१०.०२.२०१० रोजी संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अंतर्गत राज्य पाणी व स्वच्छता मिशनची नोंदणी करण्यात आली आहे. या मिशनमध्ये राज्याचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली शिखर समिती आहे. जल जीवन मिशन व स्वच्छताविषयक कार्यक्रमांचे राज्यातील नियोजन, अंमलबजावणी, संनियंत्रण याबाबत संपुर्ण जबाबदारी व अधिकार राज्य पाणी व स्वच्छता मिशनला आहेत. जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे राज्य पाणी व स्वच्छता मिशनला कार्य करण्याचे संपुर्ण अधिकार आहेत. राज्य पाणी व स्वच्छता मिशनला जल जीवन मिशनसाठी कार्यान्वयन यंत्रणा म्हणून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले आहे. राज्य पाणी व स्वच्छता समितीमध्ये शिखर समिती व कार्यकारी समिती आहे. जल जीवन मिशन मार्गदर्शक सूचनांनुसार शिखर समिती व कार्यकारी समितीची कार्यकक्षा निश्चित करण्यात आली आहे.

**५.२ जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष :–**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेता जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनची नव्याने पुनर्रचना करण्यात आली आहे.

**५.३ जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन कक्षाची कार्यकक्षा :–**

५.३.१. जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे जिल्हाधिकारी हे अध्यक्ष असतील व संबंधित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे सह अध्यक्ष असतील.

५.३.२. आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, प्रकल्प संचालक, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जलसंपदा विभाग, जलसंधारण विभाग, कृषी विभाग, वन विभाग तसेच माहिती व जनसंपर्क या विभागाचे त्या जिल्ह्याचे प्रमुख अधिकारी या मिशनचे सदस्य असतील. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांचे जिल्ह्यातील प्रमुख अधिकारी हे या मिशनचे सदस्य असतील, पाणी व्यवस्थापन, समाज विकास, सामाजिक आरोग्य या क्षेत्रातील नामांकित व्यक्ती तसेच स्थानिक खासदार, आमदार यांना या मिशनवर मानद सदस्य म्हणून घेता येईल. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा हे या मिशनचे सदस्य सचिव असतील.

५.३.३. जल जीवन मिशनचे जिल्हास्तरीय आराखडे, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनच्या मान्यतेनंतर, त्या जिल्ह्याचे मा. पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीसमोर सादर करण्यात येतील. या समितीमध्ये त्या जिल्ह्यांमधील सर्व मंत्री, तसेच मा. पालकमंत्री यांनी नेमलेले ३ आमदार हे सदस्य असतील. या समितीच्या सहमतीनंतर सदर आराखडे हे राज्य स्तरावरील समितीपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात येतील. राज्यपातळीवर मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता), मा. राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता), अपर मुख्य सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता) व मिशन संचालक, राज्य पाणी व स्वच्छता मिशन याची समिती (राज्यस्तरीय योजना मंजुरी समितीच्या मान्यतेनंतर) आराखड्यांना अंतिम मान्यता देईल.

**५.४ गट संसाधन केंद्र (पाणी पुरवठा व स्वच्छता) :—**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाच्या ग्रामस्तरावरील अंमलबजावणीसाठी, ग्राम आरोग्य, पोषण, पर्यावरण, पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांना मार्गदर्शन व मदत करण्यासाठी, त्यांचा तालुका स्तरावरील पंचायत समित्यांशी योग्य समन्वय राखण्यासाठी, तालुका स्तरावर गट संसाधन केंद्र (Block Resource Centers) स्थापन करण्यात आली आहेत. तालुक्याच्या/गटाच्या लोकसंख्येच्या आधारे प्रत्येक गट संसाधन केंद्रामध्ये २ ते ४ कर्मचारी कार्यरत आहेत.

**५.५ गट संसाधन केंद्रांची कार्ये :—**

५.५.१. ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती स्थापन करण्याकरिता ग्रामस्थांना मदत करणे.

५.५.२. ग्रामपंचायत/ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे सदस्य आणि ग्रामस्थ यांच्यामध्ये पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाविषयी जाणीव जागृती निर्माण करणे व त्यांची संवाद क्षमता. विकसित करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करणे.

५.५.३. पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाच्या विविध बाबींवर, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती/ ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्राम पातळीवरील विविध कार्यकर्ते (उदाः ASHA, अंगणवाडी कामगार, शिक्षक, स्वयंसहायता गट महिला व युवक मंडळ इ.व ग्रामस्थ यांचेमध्ये माहिती शिक्षण व संवाद ( IEC ) क्षमता वाढविण्यासाठी गट व ग्रामस्तरावर प्रशिक्षणाचे वार्षिक कार्यक्रम तयार करणे व त्याची अंमलबजावणी करणे.

५.५.४. गट संसाधन केंद्राच्या कार्यक्षेत्रातील पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत व उपाययोजनांचे व स्वच्छता विषयक उपाययोजनांचे प्राथमिक सर्वेक्षण (BASELINE SURVEY) करण्यासाठी ग्रामपंचायती व पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांना मदत करणे.

५.५.५. ग्रामस्थ, ग्रामपंचायती व पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांना वार्षिक गाव कृती आराखडा तयार करण्यासाठी व त्यास ग्राम सभेची मंजूरी मिळविण्यासाठी मदत करणे, आराखड्यामध्ये प्रस्तावित केल्यानुसार, पाणी पुरवठा योजना व स्वच्छतेच्या कामांची अंमलबजावणी व संनियंत्रण करण्याकरीता पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांना मार्गदर्शन करणे.

५.५.६. पाणी पुरवठा, पाणी गुणवत्ता तपासणी व सर्वेक्षण यामध्ये प्रशिक्षित झालेल्या गाव पातळीवरील कार्यकर्त्यांमध्ये समन्वय साधणे व ते पाणी गुणवत्ता चाचणी व सर्वेक्षण कार्यक्रम राबवित आहेत याची खात्री करण्यासाठी पाठपुरावा करणे.

५.५.७. पाणी पुरवठा, पाणी गुणवत्ता तपासणी व सर्वेक्षण तसेच स्वच्छता यांच्याशी संबंधित बाबींवर नियमितपणे लक्ष केंद्रीत केले जात आहे याची खात्री करण्यासाठी ग्रामपंचायती ASHA / अंगणवाडी कामगार, शिक्षक, स्वयंसहायता गट महिला व युवक मंडळे यांच्याशी नियमित संवाद साधणे.

५.५.८. शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये आरोग्य व स्वच्छता विषयक चांगल्या सवयींची जाणीव निर्माण व्हावी यासाठी शाळांना भेटी देऊन आरोग्य व स्वच्छता या विषयावर व्याख्याने देणे.

५.५.९. ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांना सामाजिक लेखापरीक्षण आयोजित करण्यासाठी मदत करणे.

५.५.१०. पाणी गुणवत्ता चाचणीच्या अहवालानुसार, पाणी पिण्यायोग्य ठेवण्यासाठी परिणामकारक उपाययोजना करण्याकरिता ग्रामपंचायती/ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती/सार्वजनिक आरोग्य विभाग यांना सावधान करणे व त्यांच्यात समन्वय साधून उपाययोजना करण्याबाबत त्यांना मार्गदर्शन करणे.

५.५.११ गट संसाधन केंद्रांची लेखाविषयक माहिती तसेच त्यांच्या भौतिक व आर्थिक प्रगतीची माहिती केंद्र शासनाच्या IMIS वर भरणे त्याचप्रमाणे गावे/वाड्या-वस्त्या यांची अद्ययावत माहिती IMIS वर भरण्याकरीता माहिती गोळा करण्यासाठी यंत्रणेस मदत करणे.

**६.१ पाणी गुणवत्ता कार्यक्रम :—**

६.१ राज्यात केंद्र पुरस्कृत जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण पाणी गुणवत्ता सनियंत्रण आणि सर्वेक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. सदर कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागातील जनतेला शुद्ध पाणी पुरवठा करणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. तसेच कार्यक्रमाचे खालील प्रमुख उद्देश आहेत.

- ग्रामीण भागातील सर्व सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे व घरगुती नळाद्वारे उपलब्ध होणाऱ्या पाण्याचे गुणवत्ता परीक्षण करणे.
- ग्रामीण भागातील सर्व सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची देखरेख व स्वच्छता सर्वेक्षणामध्ये लोकांचा सहभाग वाढविणे.
- पाणी गुणवत्ता तपासणीमध्ये सोप्या पद्धतीने पाणी तपासणी संचाचा वापर करणे.
- ग्रामपंचायतीमधील ५ महिलांची निवड करून, त्यांना प्रशिक्षण देवून, त्यांचा पाणी गुणवत्ता सर्वेक्षणामध्ये सहभाग नोंदवणे.
- ग्रामपंचायतीना या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये सहभागी करून घेणे व त्यांना सक्षम बनविणे.
- पाणी पुरवठा यंत्रणेतील वेळोवेळी उद्‌भवणारे दोष व दुरुस्त्या लोकसहभागातून करणे.
- लोकांमध्ये स्वच्छ व सुरक्षित पाणी पुरवठ्याबाबत व अशुद्ध पाण्यामुळे आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामाबाबत जनजागृती करणे.

६.२ या कार्यक्रमांतर्गत ग्राम पातळीपर्यत लोकांना पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता, देखरेख व सनियंत्रण यशस्वीरीत्या कशा प्रकारे करावे याबाबत माहिती देण्यासाठी राज्यस्तर / जिल्हास्तर / तालुकास्तर या तिन्ही स्तरावर प्रशिक्षण कार्यक्रम हाती घेण्यात आलेला आहे. त्यामध्ये उपमुख्य कार्यकारी अधिकारी, कार्यकारी अभियंता, अति. जिल्हा आरोग्य अधिकारी, गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, शिक्षण, विस्तार अधिकारी (आरोग्य) (पंचायत) महिला व बालकल्याण पर्यवेक्षक व प्रयोगशाळा अधिकारी, तांत्रिक कर्मचारी, सरपंच, ग्रामसेवक, आरोग्य सेवक, पाणी पुरवठा कर्मचारी, जलसुरक्षक, बचतगट, इत्यादींचा समावेश आहे.

६.३ पाणी गुणवत्ता व सनियंत्रण कार्यक्रमामध्ये स्वच्छता सर्वेक्षणाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. स्वच्छता सर्वेक्षणातून स्त्रोताभोवतालचा परिसर, पाणी पुरवठा संरचना व व्यवस्थापनातील जे काही दोष आढळून येतात त्यांचे निराकरण वेळेत करता येऊन, संभाव्य साथीस प्रतीबंध करता येतो. केंद्र शासन व जागतिक आरोग्य संघटना यांच्या नवीन निकषाप्रमाणे प्रत्येक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे सर्वेक्षण करणे आवश्यक आहे. या विभागाच्या, दिनांक २९-०८-२०१२ रोजीच्या शासन निर्णयानुसार दरवर्षी दिनांक १ एप्रिल ते ३० एप्रिल (मान्सूनपूर्व) व दिनांक २ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर (मान्सुन्पाश्चात) या कालावधीत, पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे सर्वेक्षण व त्या आधारे दिल्या जाणाऱ्या लाल कार्ड, हिरवे कार्ड प्रणालीचे बळकटीकरण व सुसूत्रता आणण्यासाठी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. आरोग्य विभागामार्फत ग्रामपंचायतीना वितरीत करण्यात आलेले लाल कार्ड परिसरात अथवा सर्व स्त्रोतांचा पाण्याचा साठा दुषित झाला आहे. तो असुरक्षित झालेला आहे. असुरक्षिततेच्या कारणाकडे लक्ष देवून ते दूर करण्याची गरज आहे. लाल कार्ड हे त्या ग्रामपंचायतीस संभाव्य साथरोगांबाबत पूर्व सूचना देत असते. लाल कार्ड देण्यात आलेल्या त्रुटी दूर केल्या असता पाण्याची गुणवत्ता चांगली राखता येते.

६.४ केंद्र शासनाच्या WQMIS पोर्टलवरील माहितीनुसार, राज्यमध्ये एकुण ९३८२० पाणी पुरवठा योजनांचे स्त्रोत आहेत.

६.५ WQMIS पोर्टलवरील माहितीनुसार, सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये क्षेत्रीय तपासणी संचाद्वारे, रासायनिक घटकांसाठी ४,०१,०९१ पाणी नमुने तपासणी करण्यात आले.

६.६ WQMIS पोर्टलवरील माहितीनुसार, सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये, ४०२९७ गावांमधुन निवड केलेल्या एकूण २,०४,२५३ महिलांना पाणी गुणवत्ता विषयक, FTK द्वारे पाणी तपासणीचे प्रशिक्षण देण्यात आले असून, प्रशिक्षणाच्या नोंदी केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर घेण्यात आल्या.

६.७ पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता तपासण्यासाठी राज्यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा अधिनिस्त १८३ प्रयोगशाळा मंजूर असून त्यापैकी सध्या ६ विभागीय, २८ जिल्हास्तरीय व १४४ उपविभागीय प्रयोगशाळा अशा एकूण १७८ प्रयोगशाळा कार्यरत आहेत. दि. २०/०७/२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार वर्षातून १ वेळा रासायनिक पाणी नमूने तपासणी (दि. ०१ ऑक्टो. ते ३१ मार्च) व २ वेळा जैविक पाणी नमूने तपासणी (१ जुन ते ३१ ऑक्टो. व १ नोव्हे. ते ३१ मे) प्रयोगशाळांमधून केली जाते. सन २०२५-२६ (माहे डिसेंबर २०२५ अखेर पर्यंत) या आर्थिक वर्षात एकूण ५०२४८९ (रासायनिक- १५३९८५ व जैविक - ३४८५०४) पाणी नमुने भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या प्रयोगशाळांमार्फत तपासण्यात आले आहेत.

६.८ पाणी गुणवत्ता सर्वेक्षण आणि सनियंत्रण कार्यक्रमांतर्गत, प्रयोगशाळेमध्ये प्राप्त नमुन्यांचे पृथःकरण करण्यात येऊन नमुन्यांचे अहवाल केंद्र शासनाच्या संकेत स्थळावर Online नोंदी करण्यात येत आहेत. सर्व प्रयोगशाळांमध्ये शासन निर्णयानुसार शुल्क आकारून खाजगी नमुने तपासणीबाबत जनजागृती करण्यात येत आहे. पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता संनियंत्रणाची जबाबदारी जिल्हा पाणी गुणवत्ता सल्लागार, पाणी गुणवत्ता निरीक्षक यांना देण्यात आली आहे.

६.९ राज्यामध्ये नव्याने १ राज्यस्तरीय प्रयोगशाळा स्थापनेस मंजुरी देण्यात आली असून २६ जिल्हा प्रयोगशाळांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. राज्यातील नवीन मंजूर असलेल्या राज्यस्तरीय प्रयोगशाळेचे बांधकाम पूर्ण झाले असून प्रयोगशाळा कार्यान्वीत करण्यासाठी आवश्यक बाह्यस्त्रोताव्दारे मनुष्यबळ भरती, सयंत्र, रसायने, काचसामान व इतर साहित्याची खरेदी प्रगतीपथावर आहे.

६.१० सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात राज्यातील पुणे, कोंकण, नाशिक, अमरावती, औरंगाबाद व नागपूर या ६ विभागीय तपासणी प्रयोगशाळांना व २८ जिल्हास्तरीय प्रयोगशाळांना NABL अधिस्वीकृती नुतनीकरण प्रमाणपत्र (Renewal of Accreditation) प्राप्त झाले आहे. तसेच राज्यातील १४४ उपविभागीय प्रयोगशाळांना (NABL Recoginition) प्राप्त झाले आहे.

**७. ग्रामीण पिण्याच्या पाण्याचा टंचाई कार्यक्रम :–**

७.१ प्रत्येक जिल्ह्यात दरवर्षी पावसाळा संपल्यानंतर पाणी टंचाई (२० लिटर्स / दिन / व्यक्तीपेक्षा कमी) झालेल्या पर्जन्यमानाचा आढावा घेऊन १ कि.मी. क्षेत्रात ज्या गावांमध्ये / वाड्यांमध्ये पिण्याच्या पाण्याचे नियमित स्त्रोत आटले किंवा कमी झाल्याने दरडोई, प्रतिदिनी २० लिटर्सपेक्षा कमी पाणी पुरवठा होईल असा अंदाज आहे, अशा गावे / वाड्यांमध्ये पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांच्याशी विचार विनिमय करुन १) ऑक्टोबर ते डिसेंबर २) जानेवारी ते मार्च ३) एप्रिल ते जून अशा तीन स्वतंत्र तिमाहीसाठी टंचाई कृती आराखडे तयार करण्यात येतात. पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ खालील अनुज्ञेय उपाययोजनांपैकी योग्य त्या उपाययोजनेची निवड करण्यात येते.

(१) बुडक्या घेणे

(२) विहिरी खोल करणे/गाळ काढणे

(३) खाजगी विहिरी अधिग्रहीत करणे

(४) टँकर /बैलगाड्यांद्वारे पाणी पुरवठा करणे

(५) प्रगतीपथावरील पाणी पुरवठा योजनेची कामे तातडीने पूर्ण करणे

(६) नळ योजनांची विशेष दुरुस्ती करणे

(७) विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती

(८) नवीन विंधण विहिरी घेणे

(९) तात्पुरत्या पूरक नळ योजना घेणे

(१०) धरणामध्ये अथवा तलावामध्ये चर खणणे.

७.२ टँकरने पाणी पुरवठा करणे ही उपाययोजना अधिक खर्चिक व तात्पुरत्या स्वरुपाची आहे. जेथे अन्य उपाययोजना शक्य नाही, तेथेच ही उपाययोजना अनिवार्य ठरते. जिल्हाधिकाऱ्यांची खात्री पटल्यास टँकर लावण्यास मान्यता दिली जाते. दिनांक १ ऑक्टोबर २००६ पासून पाणी टंचाई कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणाऱ्या नळ योजनांची विशेष दुरुस्ती करणे, विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती करणे. विहित आर्थिक व भौतिक निकषात न बसणाऱ्या टंचाई निवारक उपाययोजनांना शासन स्तरावर सचिव स्तरीय स्थायी समिती मार्फत मंजुरी देण्यात येते.

७.३ राज्यात दरवर्षी निर्माण होणाऱ्या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी, गावात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाल्यानंतर, पाणी टंचाई कार्यक्रमांतर्गत कोणतीही उपाययोजना घेतल्यास त्याबरोबरच, पुढील वर्षी त्या गावात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये म्हणून, ग्राम स्तरावरुन जलसंधारणाच्या विविध उपाययोजनांबरोबरच शिवकालीन पाणी साठवण योजना, जलपुनर्भरण कार्यक्रम इत्यादी प्रतिबंधात्मक उपाययोजना ग्राम स्तरावर राबविण्याबाबतचे आदेश दिनांक २७ फेब्रुवारी, २००८ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहेत.

७.४ खाजगी टँकर्स व ट्रक्सचे दर पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या, शासन निर्णय क्रमांक : टंचाई-२०१८/प्र.क्र.१६७/पापु-१४, दिनांक १९.१२.२०१८ अन्वये खाजगी टँकर्स व ट्रक्सचे दर पुढील प्रमाणे सुधारित करण्यात आले आहेत.

| टँकर व ट्रकवरील टाकीची पाणी वहन करण्याची क्षमता व क्षेत्र | कमाल प्रतिदिन प्रति मे. टन भाडे (रुपये) | कमाल प्रति किलोमीटर प्रति मे. टन भाडे (रुपये) |
|---|---|---|
| सर्वसाधारण | २७० | ३.४० |
| दुर्गम व अतिदुर्गम भागामध्ये अतितीव्र घाट असलेल्या ठिकाणी (३००० ते ५००० लिटर) | ३३८ | ४.३० |

वरीलप्रमाणे टँकरचे दर निर्धारित केले असले तरी, जिल्हाधिकाऱ्यांनी निविदा मागवून कमीत कमी दरात टँकर उपलब्ध करून घ्यावयाचे आहेत.

७.५ पाणी टंचाईविषयी उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्तांचे वित्तीय मंजुरीचे अधिकार शासन निर्णय, दिनांक ४ मे, २०१६ अन्वये खालीलप्रमाणे सुधारित करण्यात आले आहेत—

| अ.क्र. | उपाययोजनेचे नाव | जिल्हाधिकाऱ्यांचे अधिकार | विभागीय आयुक्तांचे अधिकार |
|---|---|---|---|
| (अ) | तात्पुरती पूरक नळ पाणी पुरवठा योजना | रु. २०.०० लक्ष पर्यंत | रु. ५०.०० लक्ष पर्यंत |
| (ब) | नळ पाणी पुरवठा योजनांची विशेष दुरुस्ती | रु. ३०.०० लक्ष पर्यंत | रु. ५०.०० लक्ष पर्यंत |
| (क) | जुन्या विहिरीची दुरुस्ती विहीरी खोलीकरण | रु. ०२.०० लक्ष पर्यंत | रु. ०३.०० लक्ष पर्यंत |
| (ड) | धरणामध्ये अथवा तलावामध्ये चर खणणे | रु. ०५.०० लक्ष पर्यंत | रु. १०.०० लक्ष पर्यंत |
| (इ) | पिण्याच्या पाण्याचे टँकर भरण्यासाठी आवश्यक ती तात्पुरती उपाययोजना. | रु. ००.५० लक्ष पर्यंत | रु. ०१.०० लक्ष पर्यंत |
| (ई) | बैलगाडीने पाणी पुरवठा करणे | प्रती दिन प्रती बैलगाडी रु. ५०० पर्यंत | |

७.६ नागरी व ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास प्रदान करण्यात आलेल्या आर्थिक मर्यादेपेक्षा जास्त किंमतीच्या तसेच विहित निकषात न बसणाऱ्या तातडीच्या उपाययोजनांना तातडीने प्रशासकीय मंजुरी देता यावी म्हणून प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली सचिवस्तरीय समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

७.७ मागील ३ वर्षामध्ये टंचाई अंतर्गत घेतलेल्या विविध उपाययोजनांवर झालेला खर्च व हाताळलेली गावे व वाड्या यांची संख्या पुढीलप्रमाणे आहे.

**(अ) विविध उपाययोजनांवर झालेला खर्च :—**

(रु. कोटी मध्ये)

| अ.क्र. | उपाययोजना | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ |
|---|---|---|---|---|
| १. | टँकर/बैलगाडीने पाणी पुरवठा करणे. | २४.०३ | २०२.७७ | १३४.६३ |
| २. | विहिर अधिग्रहीत करणे. | ९३.०८ | ३३.२९ | २७.४० |
| ३. | विहिरी खोल करणे/गाळ काढणे. | ०.८० | १.५२ | ४.८२ |
| ४. | बुडकी घेणे. | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ५. | विंधण विहिर/कुपनलिका घेणे. | १०.०२ | २३.०८ | ४२.४५ |
| ६. | नळ योजनांची विशेष दुरुस्ती करणे. | २३.९८ | ३८.७४ | ७५.४६ |
| ७. | विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती करणे. | २७.९३ | ६.७४ | १.७९ |
| ८. | तात्पुरत्या पूरक नळ योजना घेणे. | २.९६ | ५.८३ | १०.६३ |
| ९. | प्रगतीपथावरील नळ पाणी पुरवठा योजना पुर्ण करणे | ०.०० | ०.०० | ०.०० |
| १०. | नळ पाणी पुरवठा योजनेच्या स्त्रोताजवळ स्त्रोत बळकटीकरण करणे | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | एकूण | १८२.८० | ३११.९७ | २९७.१८ |

**(ब) विविध उपाययोजनेद्वारे टंचाई कार्यक्रमांतर्गत हाताळलेली गावे/वाड्या :—**

| अ.क्र. | उपाययोजना | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ |
|---|---|---|---|---|
| १. | टँकर/बैलगाडीने पाणी पुरवठा करणे. | २११९ | ७७२८ | ६३६१ |
| २. | विहिर अधिग्रहीत करणे. | १९८६ | ५२०८ | ५१७० |
| ३. | विहिरी खोल करणे/गाळ काढणे. | १०० | १९८ | २८१ |
| ४. | बुडकी घेणे. | ० | ० | ० |
| ५. | विंधण विहिर/कुपनलिका घेणे. | १८९१ | २२२७ | ३२३१ |
| ६. | नळ योजनांची विशेष दुरुस्ती करणे. | ५४३ | ६१२ | ९४९ |
| ७. | विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती करणे. | ८३६ | २०५२ | १८३० |
| ८. | तात्पुरत्या पूरक नळ योजना घेणे. | ३६ | ८१ | १६२ |
| ९. | प्रगतीपथावरील नळ पाणी पुरवठा योजना पुर्ण करणे | ०.०० | ०.०० | ०.०० |
| १०. | नळ पाणी पुरवठा योजनेच्या स्त्रोताजवळ स्त्रोत बळकटीकरण करणे | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | एकूण | ७५११ | १८१०६ | १७९८४ |

**८. निधीची उपलब्धता :—**

८.१ विभागाच्या दि. ०४-०९-२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात केंद्र शासन पुरस्कृत जल जीवन मिशन राबविण्यात येत आहे. जल जीवन मिशन अंतर्गत केंद्र व राज्य वित्तीय आकृतीबंध १:१ आहे.

८.२ जल जीवन मिशन मार्गदर्शक सूचनेनुसार केंद्र व राज्य हिश्यांतर्गत प्राप्त होणारा निधी विभागाद्वारे राज्य पाणी व स्वच्छता मिशनला PFMS प्रणालीच्या Single Nodal Account वर उपलब्ध करून दिला जातो. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार सन २०२१-२०२२ वर्षापासून वित्त विभागाच्या मान्यतेने जल जीवन मिशन अंतर्गत Escrow Account कार्यान्वित करण्यात आला आहे.

८.३ जल जीवन मिशन अंतर्गत सन २०१९-२०२० पासून केंद्र शासनाकडून प्राप्त निधी व त्या समरूप राज्य हिश्श्यांतर्गत वितरित निधीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.—

(रक्कम कोटीत)

| वर्ष | केंद्र हिश्श्याचा प्राप्त निधी | केंद्र हिश्श्याचा वितरित निधी | समरूप राज्य हिश्श्यांतर्गत देय निधी (सहाय्यिकृत बाबी व पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण घटकाकरीता केंद्र व राज्य प्रमाण ६०:४० विचारात घेऊन) | राज्य हिश्श्याचा वितरित निधी |
|---|---|---|---|---|
| २०१९-२०२० (With OB) | ६१४.७८ | ६१४.७८ | ८१४.३२ | ८१४.३२ |
| २०२०-२०२१ | ४७१.९२ | ४७१.९२ | ४४६.३३ | ४४६.३३ |
| २०२१-२०२२ | १६८०.५५ | १६८०.५५ | १७५७.४६ | १७५७.४६ |
| २०२२-२०२३ | ३९१५.६२ | ३९१५.६२ | ३८४७.६१ | ३८४७.६१ |
| २०२३-२०२४ | ७४४४.२६ | ७४४४.२६ | ७२७०.५६ | ७२७०.५६ |
| २०२४-२०२५* | १६०५.८८ | १६०५.८८ | ४०५१.९९ | ४०५१.९९ |
| २०२५-२०२६ | ०.०० | ०.०० | २३६६.५४ | २३६६.५४ |

**(दि. २९-०१-२०२६ रोजीच्या स्थितीनुसार)**

जल जीवन मिशन योजनेअंतर्गत आतापर्यंत झालेली प्रगती आणि सुरु असलेल्या कामांचा विचार करता मा. अर्थमंत्री, केंद्र सरकार यांनी सन २०२५ २०२६ च्या अर्थसंकल्पामध्ये जल जीवन मिशनचा कालावधी डिसेंबर, २०२८ पर्यंत वाढविण्याची घोषणा केली आहे. त्यानुसार केंद्रीय जल शक्ती मंत्रालयाच्या दिनांक १६ जून, २०२५ च्या पत्रान्वये जल जीवन मिशन कार्यक्रमास डिसेंबर, २०२८ पर्यंत मुदतवाढ देण्याचे विचाराधीन असल्याचे व याबाबत सक्षम स्तरावरून मंजूरी मिळाल्यानंतर केंद्र शासनाकडून राज्यांना निधी वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे कळविले आहे. तसेच पाणी हा विषय राज्य सूची अंतर्गत येत असल्याने जोपर्यंत केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होत नाही, तोपर्यंत राज्यांनी स्वतःच्या निधीमधून जल जीवन मिशनच्या योजनांची अंमलबजावणी सुरु ठेवण्याबाबत कळविले आहे. केंद्र हिस्सा अप्राप्त असताना सन २०२४-२०२५ मध्ये रु. २४८३.५८२५ कोटी व सन २०२५ - २०२६ मध्ये रु. २३६६.५४ कोटी असा एकूण रु. ४८५०.१२२५ कोटी राज्य शासनाने विशेष बाब म्हणून वितरीत केला आहे.

**९. आर्थिक बाबी :—**

या मिशनसाठी केंद्र राज्य हिस्सा ५०:५० याप्रमाणे राहणार आहे. अनुसूचित जाती/जमातीच्या लोकसंख्येप्रमाणे निधी राखीव ठेवण्यात येईल. राज्यामध्ये जल जीवन मिशन राबविण्यासाठी एकूण रु. ७०४६४.५२ कोटी (केंद्र व राज्य) इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे. हे अंदाज ढोबळमानाने काढण्यात आले असून प्रत्यक्ष योजनेवरील खर्च त्या त्या योजनेच्या प्रशासकीय मान्यतेप्रमाणे खर्च करण्यात येईल.

उपरोक्त रकमेपैकी ५० टक्के हिस्सा व त्याचप्रमाणे प्रतिनियुक्तीवरील पदाच्या वेतन व भत्त्यासाठी आवश्यक निधी राज्य शासनाकडून अर्थसंकल्पित करण्यात येतील.

एकूण निधीपैकी ५ टक्के निधी सहाय्यकृत बाबीसाठी व २ टक्के निधी पाणी गुणवत्ता व सर्वेक्षण कार्यक्रमासाठी पाणी नमुने प्रयोगशाळांमध्ये तपासणे व इतर आनुषंगिक बाबीसाठी राखीव असेल. प्रत्येक राज्याने सन २०२५ पर्यंत प्रत्येक वर्षांत देण्यात येणाऱ्या नळ जोडण्यांची संख्या व त्या अनुषंगाने येणारा खर्च यांची माहिती असणारा राज्य कृती आराखडा तयार करणे आवश्यक आहे.

राज्य पाणी व स्वच्छता मिशनकडून ग्रामपंचायतीला जल जीवन मिशन अंतर्गत आवश्यकतेप्रमाणे निधीची उपलब्धता करता येईल, यासाठी आमदार/ खासदार (स्थानिक विकास कार्यक्रम) निधी, सीएसआर किंवा इतर सामाजिक संस्थांमार्फत निधी उपलब्ध करता येईल. पाणी पुरवठा योजनांकरिता खासदार निधीतून प्राप्त रक्कम केंद्र हिस्सा म्हणून तर आमदार निधीतून प्राप्त रक्कम राज्याचा हिस्सा ग्राह्य धरली जाईल.

## ४.३ स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण)

राज्यात पेयजल व स्वच्छता विभाग जल शक्ती मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार दिनांक २ ऑक्टोबर, २०१४ पासून ते सन २०१९ पर्यंत स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) राबविण्यात आले. ग्रामीण भागात स्वच्छता राखणे, उघड्यावर मलविसर्जन करण्याच्या सवयीस प्रतिबंध करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश होता. या अंतर्गत ग्रामीण महाराष्ट्र सन २०१८ मध्ये हागणदारी मुक्त म्हणून घोषित करण्यात आला.

**स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ :-**

पेयजल व स्वच्छता विभाग जल शक्ती मंत्रालय, नवी दिल्ली यांनी सन २०२०-२१ ते २०२४-२५ या कालावधीत स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा–२ राबविण्याच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. तथापि पेयजल व स्वच्छता विभाग, नवी दिल्ली यांच्या दिनांक ६-१-२०२६ च्या पत्रानुसार स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) टप्पा–२ ला सन २०२६-२७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यानुसार सन २०२६-२०२७ पर्यंत संपूर्ण राज्य हागणदारी मुक्त अधिक (ODF +) मॉडेल बनवणे हा मुख्य उद्देश आहे. स्वच्छतेमध्ये सातत्य राखण्यासाठी वैयक्तिक शौचालय बांधकाम, सार्वजनिक शौचालय बांधकाम यासोबत खालील घटकांचा समावेश स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा–२ अंतर्गत करण्यात आला आहे.

- घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन
- प्लास्टिक कचरा व्यवस्थापन
- गोबर धन प्रकल्प
- मैला गाळ व्यवस्थापन
- शाश्वत स्वच्छतेच्या अनुषंगाने विविध जन जागृतीचे उपक्रम घेणे
- विविध घटकांना प्रशिक्षण देणे

राज्य मंत्रीमंडळाच्या दि. २८ जूलै, २०२१ च्या बैठकीत राज्यात केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण), टप्पा–२ ही योजना आर्थिक वर्ष २०२०-२१ ते २०२४-२५ या कालावधीत राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याअंतर्गत एकूण रु. १०७७१३८.४८ लक्ष इतक्या रकमेचा प्रकल्प अंमलबजावणी आराखडा तयार करण्यात आला आहे. यामध्ये स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण), १५ वा वित्त आयोग, मनरेगा व इतर योजना यांच्या कृतीसंगमाने निधी घ्यावयाचा आहे. त्यानुषंगाने स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा–२ च्या अंमलबजावणीबाबत, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या दि. ११ ऑक्टोबर, २०२१ च्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

सन २०२० पासून ते दि. ३१-३-२०२५ पर्यंत स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा–२ अंतर्गत पूर्ण झालेली कामे पुढीलप्रमाणे आहे.—

| अ. क्र. | घटकाचे नाव | झालेली कामे |
|---|---|---|
| १. | वैयक्तिक शौचालय | ७६१७२१ |
| २. | सार्वजनिक शौचालय | १७२९८ |
| ३. | घनकचरा व्यवस्थापन (एकूण गावे) (भौतिक दृष्ट्या पूर्ण) | ३२३५२ |
| ४. | सांडपाणी व्यवस्थापन (एकूण गावे) (भौतिक दृष्ट्या पूर्ण) | ३७७०६ |
| ५. | गोबर धन प्रकल्प | २५ |
| ६. | प्लास्टिक कचरा व्यवस्थापन प्रकल्प | ८० |
| ७. | मैलागाळ व्यवस्थापन प्रकल्प | ०१ |
| ८. | हागणदारी मुक्त अधिक मॉडेल झालेली गावे | ३१०६९ |

सन २०२५-२६ या वर्षात १३-१-२०२६ पर्यंत स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत पूर्ण झालेली कामे खालीलप्रमाणे आहे.—

| अ. क्र. | घटकाचे नाव | झालेली कामे |
|---|---|---|
| १. | वैयक्तिक शौचालय | ५४१४३ |
| २. | सार्वजनिक शौचालय | ३००२ |
| ३. | घनकचरा व्यवस्थापन (एकूण गावे) (भौतिक दृष्ट्या पूर्ण) | १२८२८ |
| ४. | सांडपाणी व्यवस्थापन (एकूण गावे) (भौतिक दृष्ट्या पूर्ण) | १३०७१ |
| ५. | गोबर धन प्रकल्प | ९ |
| ६. | प्लास्टिक कचरा व्यवस्थापन प्रकल्प | ९४ |
| ७. | मैलागाळ व्यवस्थापन प्रकल्प | ० |
| ८. | हागणदारी मुक्त अधिक झालेली गावे | ३३९० |

सन २०२५-२६ या वर्षाचा वार्षिक कृती आराखडा जल शक्ती मंत्रालय, नवी दिल्ली यांना सादर करण्यात आला असून त्यास केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. सदर वार्षिक कृती आराखडा खालील प्रमाणे आहे.

(रु. लाखात)

| घटक | उद्दिष्ट | स्व. भा. मि. निधी | | | १५ वा वित्त आयोग | मनरेगा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा | एकूण | | |
| घनकचरा व्यवस्थापन | १७७५३ | ४०५० | २७०० | ६७५० | २६१८१८ | ३०१९ |
| सांडपाणी व्यवस्थापन | १८५५६ | ७२२२६ | ४८१५१ | १२०३७७ | १००४८४ | १२५५९ |
| प्लास्टिक कचरा व्यवस्थापन | २३१ | २८१३ | १८७५ | ४६८८ | ४७९४ | ०.०० |
| गोबर्धन प्रकल्प | ११ | ३२ | २१ | ५३ | ४७९४ | ०.०० |
| मैला गाळ व्यवस्थापन | ५२८ | ३१०१५ | २०६७७ | ५१६९२ | ०.०० | ०.०० |
| एकूण सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन | — | ४७७२२६ | ५०८५१ | ५२८०७७ | ३६२३०२ | १५५७८ |
| वैयक्तिक शौचालय | १३०९८८ | ९४३१.१४ | ६२८७.४२ | १५७१८.५६ | ०.०० | ०.०० |
| सार्वजनिक शौचालय | ७५०३ | ९४५३.७८ | ६३०२.५२ | १५७५६.३० | ६७५२.७० | ०.०० |
| माहिती, शिक्षण, संवाद व क्षमता बांधणी | — | ४०४३ | २६९६ | ६७३९ | ०.०० | ०.०० |
| प्रशासकीय बाबी | — | १३४८ | ८९९ | २२४६ | ०.०० | ०.०० |
| एकूण प्रकल्प | — | १३४७८० | ८९८५४ | २२४६३४ | ३७३९२४ | १५५७८ |

**संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान :—**

१. ग्रामीण जनतेचे आरोग्यमान उंचावण्यासाठी सन २०००-२००१ पासून संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत जन जागृतीचा व्यापक कार्यक्रम अंमलात आणण्यात आला. त्यामधून लोकांच्या पुढाकारामध्ये शासनाचा सहभाग असा नवीन विचार विकास योजनांना देण्यात आला. लोकांना प्रोत्साहन देण्यासाठी या अभियानांतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा सुरु केली आहे. या अभियानास लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने, हा कार्यक्रम आता कायमस्वरुपी राबविण्यात येत आहे.

२. स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-२ तसेच विविध उपक्रम व कार्यक्रमांतून सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छतेच्या मालमत्ता व साधन-सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. तसेच यापूढेही निर्माण करण्यात येणार आहेत. सदर स्वच्छतेच्या मत्तांची व साधन-सुविधांची निगा राखणे, सुस्थितीत ठेवणे व त्याचा सतत सुयोग्य वापर करणे. यासाठी मनुष्यबळ व निधी उपलब्ध करून, स्वच्छता मत्तांची निर्मिती, दुरुस्ती व देखभाल करणाऱ्या ग्रामस्थ व ग्रामपंचायतींच्या प्रयत्नांची दखल घेवून, त्यांच्या प्रयत्नांकरिता ग्रामपंचायतींना रोख बक्षिसे व सन्मानचिन्ह देवून, त्यांचा गौरव या अभियानांतील स्पर्धेतून करण्यात येतो. स्वच्छतेसंबंधित विहीत बाबी या अभियानातील विविध स्पर्धेत समाविष्ट करण्यात आल्या आहेत. त्यानुषंगाने कार्यपद्धती, गुणांकन निकष, तपासणी पद्धती यात यथोचित बदल करून, सन २०२२-२३ व त्यापुढील कालावधीत संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यासाठी नव्याने एकत्रित मार्गदर्शक सूचना दिनांक ०७ ऑक्टोबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत.

३. यानुसार संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेअंतर्गत जिल्हा परिषद गट स्तर, जिल्हा परिषद स्तर, विभाग स्तर व राज्य स्तरावर पात्र ग्रामपंचायतींना पुरस्कार देण्यात येतात. या अभियानांतर्गत सांडपाणी व्यवस्थापन, पाणी गुणवत्ता व पाणी व्यवस्थापन आणि शौचालय व्यवस्थापन या स्पर्धांमध्ये पात्र ठरणाऱ्या ग्रामपंचायतींना जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर विशेष पुरस्कारही प्रदान करण्यात येतात. संत गाडगेबाबा सन २०२५-२६ या वर्षाकरिता ग्राम स्वच्छता अभियानाकरिता रु. ३०११.९० लक्ष इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. तसेच अभियानांतर्गत स्वच्छतेसंदर्भातील विविध उपक्रमांमध्ये (प्रत्येक बाबीमध्ये) सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक, पंचायत समिती व जिल्हा परिषद मधील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन तज्ञ (SWM/LWM/SLWM तज्ञ) पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, पंचायत समिती तसेच, जिल्हास्तरावर जिल्हा समन्वयक (स्वच्छ भारत अभियान) व प्रकल्प संचालक (जल जीवन मिशन)/उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) यांना राज्यस्तरावरून प्रशस्तीपत्रक व मानचिन्ह देण्यात येणार आहे.

**४. संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानात प्रामुख्याने खालील पुरस्कारांचा समावेश आहे.**

**(अ) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा पुरस्कार :-**

या स्पर्धेअंतर्गत प्रत्येक स्तरावरील पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतींना खालीलप्रमाणे पुरस्कार रकमा प्रदान करण्यात येतात :–

| अ.क्र. | पुरस्कार स्तर | पुरस्कार रक्कम | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रथम | द्वितीय | तृतीय |
| १. | जिल्हा परिषद गट | रु. ६०,००० | – | – |
| २. | जिल्हास्तर | रु. ६ लक्ष | रु. ४ लक्ष | रु. ३ लक्ष |
| ३. | विभागस्तर | रु. १२ लक्ष | रु. ९ लक्ष | रु. ७ लक्ष |
| ४. | राज्यस्तर | रु. ५० लक्ष | रु. ३५ लक्ष | रु.३० लक्ष |

**(ब) विशेष पुरस्कार :-**

जिल्हा, विभाग व राज्य स्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकावर आलेल्या ग्रामपंचायती वगळून, जिल्हा, विभाग व राज्य स्तरावर द्यावयाच्या विशेष पुरस्कारासाठी, खालील निकष विचारात घेवून, ग्रामपंचायतींची निवड करण्यात येवून, पुरस्कार रकमा प्रदान करण्यात येतात.

| अ.क्र. | पुरस्काराचे नाव | निवडीचे निकष | बक्षिस रक्कम (रुपये) | |
|---|---|---|---|---|
| १. | स्व. वसंतराव नाईक पुरस्कार : घनकचरा, सांडपाणी व मैला गाळ व्यवस्थापन. | शासन निर्णय दि. ०७-१०-२०२२ मधील परिशिष्ट-२ मधील अ.क्र. (३) (४) व (५) मधील एकूण ५६ गुणांपैकी जास्त गुण प्राप्त करणारी ग्रामपंचायत. | जिल्हा स्तर<br>विभाग स्तर<br>राज्य स्तर | ५०,०००<br>७५,०००<br>३,००,००० |
| २. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार : पाणी गुणवत्ता व पाणी व्यवस्थापन. | शासन निर्णय दि. ०७-१०-२०२२ मधील परिशिष्ट-२ मधील अ.क्र. (१) मधील एकूण ३४ गुणांपैकी जास्त गुण प्राप्त करणारी ग्रामपंचायत. | जिल्हा स्तर<br>विभाग स्तर<br>राज्य स्तर | ५०,०००<br>७५,०००<br>३,००,००० |
| ३. | स्व. आबासाहेब खेडकर पुरस्कार : शौचालय व्यवस्थापन. | शासन निर्णय दि. ०७-१०-२०२२ मधील परिशिष्ट-२ मधील अ.क्र. (२) मधील एकूण ६७ गुणांपैकी जास्त गुण प्राप्त करणारी ग्रामपंचायत. | जिल्हा स्तर<br>विभाग स्तर<br>राज्य स्तर | ५०,०००<br>७५,०००<br>३,००,००० |

५. या स्पर्धेतर्गत खालील उपक्रमांमध्ये (प्रत्येक बाबीमध्ये) सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक, पंचायत समिती व जिल्हा परिषद मधील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन तज्ञ (SWM/LWM/SLWM तज्ञ) पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, पंचायत समिती तसेच, जिल्हास्तरावर जिल्हा समन्वयक (स्वच्छ भारत अभियान) व प्रकल्प संचालक (जल जीवन मिशन)/उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) यांना सुद्धा राज्यस्तरावरून प्रशस्तीपत्रक व मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

| अ.क्र. | उपक्रम/बाब | तपशिल |
|---|---|---|
| १. | संबंधित वर्षात बांधण्यात आलेली वैयक्तिक शौचालय संख्या. | i) जिल्ह्यात सर्वात जास्त संख्येने शौचालय बांधून सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक.<br>ii) जिल्ह्यात सर्वात जास्त संख्येने शौचालय बांधून सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या पंचायत समितीचे गटविकास अधिकारी. |
| २. | शौचालयांचे रेट्रोफिटींगची संख्या | i) जिल्ह्यात सर्वात जास्त संख्येने एक खड्डा शौचालयांचे दोन खड्डा शौचालयात रुपांतर करण्याबाबत सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक.<br>ii) जिल्ह्यात सर्वात जास्त संख्येने एक खड्डा शौचालयांचे दोन खड्डा शौचालयात रुपांतर करण्याबाबत सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या पंचायत समितीचे गटविकास अधिकारी.<br>iii) राज्यात सर्वात जास्त संख्येने एक खड्डा शौचालयांचे दोन खड्डा शौचालयात रुपांतर करण्याबाबत सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या करणाऱ्या जिल्ह्याचे, जिल्हा समन्वयक (स्वच्छ भारत अभियान) व प्रकल्प संचालक (जल जीवन मिशन)/ उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता). |

| अ.क्र. | उपक्रम/बाब | तपशिल |
|---|---|---|
| ३. | वैयक्तिक शौचालय बांधकाम प्रोत्साहन अनुदानाची टक्केवारी | i) जिल्ह्यात सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या पंचायत समितीचे गटविकास अधिकारी.<br>ii) राज्यात सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या जिल्ह्याचे जिल्हा समन्वयक (स्वच्छ भारत अभियान) व प्रकल्प संचालक (जल जीवन मिशन)/उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता). |
| ४. | घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनांतर्गत पूर्ण झालेल्या कामांची संख्या. | i) जिल्ह्यात सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या पंचायत समितीचे गटविकास अधिकारी.<br>ii) राज्यात सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या जिल्ह्याचे जिल्हा समन्वयक (स्वच्छ भारत अभियान) व प्रकल्प संचालक (जल जीवन मिशन)/ उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) आणि मुख्य कार्यकारी अधिकारी. |
| ५. | मैला गाळ व्यवस्थापनांतर्गत पूर्ण झालेल्या कामांची संख्या. | i) जिल्ह्यात सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या पंचायत समितीचे गटविकास अधिकारी.<br>ii) राज्यात सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या जिल्ह्याचे जिल्हा समन्वयक (स्वच्छ भारत अभियान) व प्रकल्प संचालक (जल जीवन मिशन)/ उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) आणि मुख्य कार्यकारी अधिकारी. |
| ६. | जिल्ह्यात व तालुक्यात सर्व गावांत कचरा विलगीकरण लागू करणे, हागणदारीमुक्त अधिक (ODF+) गावांची माहे मार्च अखेर घोषणा करणे. | अ. क्र. ६ ते ८ येथे नमूद प्रत्येक बाबीमध्ये जिल्ह्यातील पंचायत समितींपैकी सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यास व जिल्ह्याचे जिल्हा समन्वयक (स्वच्छ भारत अभियान) व प्रकल्प संचालक (जल जीवन मिशन)/ उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) आणि मुख्य कार्यकारी अधिकारी. |
| ७. | संपूर्ण जिल्ह्यात व तालुक्यात प्लॅस्टिक कचरा संकलन/वर्गीकरण व व्यवस्थापन. | —वरीलप्रमाणे— |
| ८. | गोबरधन प्रकल्प पूर्णपणे कार्यान्वित करणे. | —वरीलप्रमाणे— |

६. दिनांक ०७ ऑक्टोबर, २०२२ शासन निर्णयातील परिशिष्ट-३ नुसार सन २०२५-२६ करिता संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आखण्यात आले आहे.

| अ.क्र. | कार्यक्रम/बाब | कालावधी | दिनांक ०७ ऑक्टोबर, २०२२ शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | अभियान घोषणा व बैठकांचे आयोजन. | ११ ऑक्टोबर ते १८ ऑक्टोबर | ३ (i) |
| २. | ग्रामपंचायत स्तर समिती गठण व कृती कार्यक्रम निश्चिती करणे, त्याची अंमलबजावणी करणे आणि परिशिष्ट-२ नुसार स्वयंमूल्यांकन सादर करणे. | १९ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर | ३ (ii)<br>३ (iii)<br>३ (iii) (a)<br>३ (iii) (b) |
| ३. | जिल्हा परिषद गट स्तर स्पर्धा व तपासणी. | २१ नोव्हेंबर ते २१ डिसेंबर | ३ (iv)<br>३ (iv) (a)<br>३ (iv) (b) |
| ४. | जिल्हा परिषद गट स्तर पुरस्कार वितरण समारंभ. | १२ जानेवारी | ३ (iv) (b) |
| ५. | जिल्हा स्तर तपासणी. | २२ डिसेंबर ते ६ जानेवारी | ३ (v) |
| ६. | जिल्हा स्तर पुरस्कार वितरण समारंभ. | २६ जानेवारी | ३ (v) |
| ७. | विभागीय स्तरावरील तपासणी. | ७ जानेवारी ते ३० जानेवारी | ३ (vi) |
| ८. | विभाग स्तरावरील सत्कार सोहळा. | २३ फेब्रुवारी | ३ (vii) |
| ९. | राज्यस्तरीय तपासणी व अहवाल सादर करणे. | ६ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी | ३ (viii) |
| १०. | अंतिम निवड. | ४ मार्च ते ३१ मार्च | ३ (ix) |
| ११. | राज्यस्तरीय पुरस्कार वितरण समारंभ. | २२ एप्रिल | ३ (x) |

**सन २०२५-२६ पर्यंतच्या अभियानाची माहिती खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | शासन निर्णय | अभियानाची अंमलबजावणी<br>दि. ०७/०२/२०२५ पर्यंतची माहिती |
|---|---|---|
| १. | सन २०२४-२५ संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान– शासन निर्णय दिनांक ७ ऑक्टोबर, २०२२ | विभागस्तरावरील संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत राज्यस्तरावर पात्र ठरलेल्या ग्रामपंचायतींची निकाल अंतिम टप्प्यात आहे. |
| २. | सन २०२५-२६ संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान– शासन निर्णय दिनांक ७ ऑक्टोबर, २०२२ | जिल्हा परिषद गट तपासणीः अमरावती, बुलढाणा, चंद्रपुर, गोंदिया, हिंगोली, कोल्हापूर, नागपूर, नाशिक, सांगली, वर्धा, वाशिम, यवतमाळ या जिल्ह्यांच्या जिल्हा परिषद गटाच्या स्पर्धा पुर्ण झाल्या आहेत. तर धुळे, ठाणे जिल्ह्याची सुरू असुन सातारा, पुणे व छत्रपती संभाजीनगर, अकोला, बीड,भंडारा, जळगाव, जालना, लातूर, नांदेड, नंदुरबार, धाराशिव, पालघर, परभणी, रायगड, रत्नागिरी, सातारा, सिंधुदुर्ग, सोलापुर या जिल्ह्यांची बाकी आहे.<br>जिल्हास्तरावरील स्पर्धा केवळ वाशिम जिल्ह्याची सुरु असुन इतर ३३ जिल्ह्यांच्या स्पर्धा बाकी आहेत. |